# वार्षिक लेखापरिक्षण अहवाल

## सन २००९ - १०

# वार्षिक लेखापरिक्षण अहवाल

## सन २००९-१०

## लेखा विभाग

### आक्षेप क्रं. ०१ :- ताळेबंद पत्रकाबाबत.

सन २००९-१० ह्या वर्षातील लेखाशाखेची दि. ३१.०३.२००९ ची सर्वसाधारण रोकडवही व विविध बँकाच्या विवरण पत्राची पडताळणी केली त्यानुसार खालील प्रमाणे विसंगती निदर्शनात आलेली आहे.

| अ.क्र. | बँकेचे नांव | सर्व रोखवही प्रमाणे शिल्लक | बँक विवरणपत्रा प्रमाणे शिल्लक | फरक |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक | १,२७,५४,४९६.९७ | ५,२८,२८,६६३.४७ | (-)४,००,७४,१६६.५० |
| २ | भारतीय स्टेट बँक | ६२,१८,२२९.८१ | ७,०४,६४,०७०.८३ | (-) ६,४२,४५,८४१.०२ |
| ३ | इंडियन बँक | ३५,८६,२०५.२५ | १,२६,०४,७५०.७५ | (-)९०,१८,५४५.५० |
| ४ | देना बँक | १५,१६,७५,८८१.०० | २,३८,७०९.२० | १५,१४,३७,१७१.८० |
| ५ | ओ.बी.सी | ३७,८५,५६७.६१ | २,२४,०३,१९९.८९ | (-)१,८६,१७,६३२.२८ |
| ६ | एफ.डी. | ९,२३,४९७.९६ | - | - |
| ७ | भारतीय स्टेट बँक (कर) | ६,८७,४५,५९५.०१ | (स्टेटमेंट उपलब्ध नाही) | - |
| ८ | भारतीय स्टेट बँक (पा.पु.) | २,७७,९५,०२८.०० | (स्टेटमेंट उपलब्ध नाही) | - |

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ चे नियम ५९ (१) नुसार प्रत्येक वर्षाअखेर रोकडवहीतील शिल्लकेचा बँकच्या पासबुकातील (बँक स्टेटमेंटतील) शिल्लकेशी मेळ होणारे पत्रक 'ताळमेळ पत्रक' तयार करणे आवश्यक आहे. तसेच जर काही फरक असेल तर त्यासाठी रोकड वहीत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

उपरोक्त तक्त्यातील रोखवहीतील शिल्लक व बँकेतील शिल्लकमध्ये फरक येत असल्याचे दिसून येते. सदर फरकाबाबत ताळमेळ पत्रक तयार करणेची कार्यवाही लेखा विभागाने केलेली नाही.

## आक्षेप क्रं ०२ :- अखर्चित अनुदाने बाबत...

सन २००९-१० हया वित्तीय वर्षातील शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाबाबत तपासणी केली असता अखर्चित अनुदानाची रक्कम १३७.०९ इतकी असल्याचे आढळून आले.

(आकडे लाखात)

| अ.क्र | अनुदानाचे नांव | बँकेचे नांव | अखर्चित रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दहावा वित्त आयोग | इंडियन बँक | ०.६६ |
| २ | दलित वस्ती सुधारणा | ओ.बी.सी. | १६.१२ |
| ३ | रस्तानिधी | बँक ऑफ इंडिया | १०३.६६ |
| ४ | आमदार खासदार फंड | बँक ऑफ इंडिया | १६.६५ |
| | | एकुण | १३७.०९ |

उपरोक्त अखर्चित अनुदानाची रक्कम मोठया प्रमाणावर आहे. वास्तविक ज्या कामासाठी अनुदान प्राप्त झाले आहे. त्या कामाला प्राधान्य देऊन अनुदानाचा योग्य विनियोग करणे गरजेचे आहे. अन्यथा अखर्चित अनुदानाची रक्कम व्यपगत होण्याची शक्यता असते.

सबब विभागप्रमुखांनी योग्य ती कार्यवाही करावी.

**आक्षेप क्रं. ०३ :- वार्षिक जमा खर्च लेखे व मत्ता दायित्व विवरण पत्राबाबत...**

OK.

सन २००९-१० ह्या वित्तीय वर्षाचे वार्षिक जमा खर्च लेखे व मत्ता व दायित्व (ताळेबंद) लेखा विभागाने तयार केलेले नाहीत.

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १२६ अन्वये महापालिकेच्या मत्ता व दायित्वाबाबतचे विवरणपत्र तयार करणे आवश्यक आहे.

सबब संबंधीत विभागप्रमुखांनी योग्य ती कार्यवाही करावी.

**आक्षेप क्रं ०४ :- अग्रीम वसुलीबाबत...**

सन २००९-१० या वित्तीय वर्षाच्या अखेरीस रक्कम रु. ३६,१८,६७,५४४/- (अक्षरी रु. छत्तीस कोटी अठरा लाख सदुसष्ट हजार पाचशे चौव्वेचाळीस रुपये मात्र) एवढया रक्कमेचे समायोजन होणे बाकी आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | इसमाचे नांव | ठेवीचा तपशील | प्रमाणक क्रं. | दिनांक | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. अेस. व्ही. कुलकर्णी | विकास आराखडा | | ९३-९४ | १७५७ |
| २ | श्री. चारुदत्त नाईक | सर्वेक्षण | | १/४/९३ | १०००० |
| ३ | मे. अेस. व्ही.कुलकर्णी | नगररचना सेमिनार | | २९/१२/९३ | १५०० |
| ४ | मे. सुरेश सोनावळे | बांधकाम विभागकरिता | | ११/१/९५ | २००० |
| ५ | श्री. सचिन जुवेकर | पाणीपुरवठा | ४०९ | १०/६/९४ | १०००० |
| ६ | उपसंचालक नगररचना कोकणभवन | अग्रीम | | १०/७/९५ | २५००० |
| ७ | श्री. सुरेश सोनासळे | अग्रीम | | १८/८/९५ | १५००० |
| ८ | श्री. सुधाकर राणे | पाणीपुरवठा | २१८ | २१/५/९६ | १०००० |
| ९ | श्री. सुधाकर राणे | अग्रीम | ७०५ | ६/८/९६ | १०००० |
| १० | श्री. शंकर कुलकर्णी | क्रीडा स्पर्धासाठी | ८८१ | १४/१२/९९ | १६३५० |
| ११ | श्री. यशवंत भालेराव | निवडणूक | २६० | १५/७/०२ | १०००० |
| १२ | श्री. संजय कांबळे | अग्रीम | २००० | ३१/३/०५ | ३०२५० |
| १३ | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | १२४५ | २६/१०/०७ | ३४१८७५ |
| १४ | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | १२६६ | १/११/०७ | २८७७३५ |
| १५ | डॉ. नंदकिशोर लहाने | पल्सपोलिओ | १५३० | १/१२/०७ | ३४७२५० |
| १६ | श्री. गणेश केशव पाटील | जिजामाता उद्यान मुंबई येथे | १९३३ | ८/२/०८ | २१४४१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | डॉ. नंदकिशोर लहाने | पल्स पोलिओ | २०४७ | १८/२/०८ | ३५४५२५ |
| १८ | डॉ. नंदकिशोर लहाने | जागतिक क्षयरोग दिना निमित्त | २३२२ | २५/३/०८ | १५००० |
| १९ | डॉ. नंदकिशोर लहाने | पल्स पोलिओ | ३० | २३/४/०५ | ३५१५५० |
| २० | डॉ. नंदकिशोर लहाने | पल्स पोलिओ | १०२ | ७/५/०८ | ३५१५५० |
| २१ | श्री. हंसराज मेश्राम | अभ्यास दौरा | १०१५ | २२/१२/०८ | ३७७०८९.५ |
| २२ | श्री. सुरेश साळवी | वैद्यकिय खर्चासाठी | १६१४ | २६/३/०९ | १५०००० |
| २३ | श्री. सुभाष प्रोजेक्ट ॲन्ड मार्केटिंग | भुयारी गटार जे.एन.एन.यु. आर.एम | १ | १९/३/०९ | ३३०९४३५२९ |
| २४ | मे. सुभाष प्रोजेक्ट ॲन्ड मार्केटिंग | भुयारी गटार जे.एन.एन.यु. आर.एम | १ | १७/४/०९ | २७५०५१०८ |
| २५ | श्री. सुनिल कावणकर | पोस्टाची तिकीटे खरेदी करिता | ४३ | २४/४/०९ | ५००० |
| २६ | श्री. बाळु विंगीयन | वैद्यकिय खर्चासाठी | ५२ | ४/५/०९ | ६०००० |
| २७ | श्री. संपत मदवान | ५ जुन जागतिक पर्यावरण दिन | १६३ | ३/६/०९ | १००००० |
| २८ | श्री. सुनिल काळे | पोस्टाची तिकीटे खरेदी करिता | २६३ | ३/७/०९ | १०००० |
| २९ | श्री. प्रेमनाथ भगवान पाटील | वैद्यकिय खर्चासाठी | ३९० | २३/७/०९ | ८५१०० |
| ३० | डॉ. बि.डी.चकोर | पल्स पोलिओ | ७११ | २४/९/०९ | २५१०५ |
| ३१ | श्रीम. विश्वभारती चहांदे | अनामत परतावा | ९२८ | १६/१०/०९ | ६००० |
| ३२ | डॉ. बि.डी. चकोर | पल्स पोलिओ | ११६४ | १/१२/०९ | २५५५५ |
| ३३ | डॉ. बि.डी.चकोर | पल्स पोलिओ | १३४९ | ३१/१२/०९ | २५५५५ |
| ३४ | डॉ. बि.डी. चकोर | पल्स पोलिओ | १३७८ | ८/१/२०१० | १५६६३० |
| ३५ | डॉ. बि.डी.चकोर | पल्स पोलिओ | १५७० | ५/२/२०१० | १५६०९० |
| | | | | एकुण | ३६,१८,६७,५४४ |

सदर रक्कमेपैकी काही रक्कमा सन १९९३-९४ पासुन प्रलंबित आहेत. प्रतिनियुक्तीच्या अधिका-यांना अग्रीम दिल्याचे दिसुन येते तसेच मनपाचे कर्मचा-यांनी एकदा घेतलेल्या अग्रीम रक्कमेचे समायोजन झालेले नसतानाही पुन्हा पुन्हा अग्रीम घेतलेले आहे. ज्या कामासाठी अग्रीम दिला आहे. त्या रक्कमा साधारणत: वर्षभरात समायोजन करणे क्रमप्राप्त आहे.

सबब संबंधित विभागप्रमुखांनी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

## आक्षेप क्रं ०५ :- मत्ता दायित्वाबाबतचे विवरणपत्राबाबत.

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १२६ अन्वये महापालिकेच्या दायित्वाबाबतचे विवरणपत्र तयार करुन ते महापालिकेसमोर ठेवून शासकीय राजपत्रात प्रसिध्द करणेंत आले पाहिजे. अशा विवरणपत्राची एक प्रत शासनाकडे व महालेखापाल, मुंबई हयांच्याकडे पाठविणे बाबत तरतुद आहे. परंतु लेखाविभागाने सन २००९-१० हया वित्तीय वर्षाचे मत्ता दायित्वाचे विवरणपत्र तयार केले नाही.

सबब संबंधित विभागप्रमुखांनी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

# सन २००९-१०
## वृक्षप्राधिकरण विभाग

***आक्षेप क्र :- ०६***

सन २००९-१० या वर्षातील दि. १/४/२००९ ते ३१/३/२०१० या आर्थिक वर्षातील प्रस्ताव, नस्ती, लेखे, अभिलेख लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे बाबत मुख्यलेखापरिक्षक यांचे स्तरावरुन जा.क्र.मनपा/मुलेप/१५३/२००९-१० दि. २६/०३/२०१० अन्वये पत्र देण्यात आले होते.

त्यानुसार खालीलप्रमाणे अभिलेख तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळुन आलेली आहे.

स्टॉफ रजिस्टर नमुना क्रं. ११६.

| अ.क्र | आवक मालाचा प्रकार | स्टॉक रजिस्टर वरील तपशील | |
|---|---|---|---|
| | | आवक माल | जावक माल |
| १ | सिमेंट कुंडया पान क्रं. २ (स्टॉक रजिस्टर) | १०० नग दि. १५/६/२००९ | वापर (निरंक) |
| २ | आरिका पाम १ मीटर उंच पान क्रं. ९ (स्टॉक रजिस्टर) | १०० नग दि. १५/६/२००९ | वापर (निरंक) |
| ३ | लॉन मुव्हरमशिन पान क्रं. २० (स्टॉक रजिस्टर) | १ नग दि. १५/६/२००९ | वापर (निरंक) |
| ४ | स्प्रिंकलर पा.क्रं. २१(स्टॉक रजिस्टर) | ६ नग दि. २९/७/२००९ | वापर (निरंक) |
| ६ | धागेवाला प्लॅस्टीक पाईप पान क्रं. २३(स्टॉक रजिस्टर) | ८०० फुट दि. २९/७/२००९ | वापर (निरंक) |
| | पान क्रं. ३६ | १२०० फुट | वापर (निरंक) |

वरीलप्रमाणे स्टॉक रजिस्टरमध्ये दि. १ एप्रिल २००९ रोजी व दि. ३१ मार्च २०१० रोजी शिल्लक असलेल्या मालाची नोंद घेतलेली दिसुन येत नाही. मात्र सदर वर्षभरात फक्त खरेदी केलेल्या मालाची नोंदी आहेत. मात्र मालाचा वापर कुठे व केव्हा व कोणी केलेला आहे याच्या नोंदी केल्याचे आढळुन आलेले नाही. त्यामुळे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

याबाबत विभाग प्रमुखांनी खुलासा सादर करावा.

***आक्षेप क्र :- ०७***

वृक्षप्राधिकरण विभागाकडुन ठेकेदाराकडुन मजुर पुरवठा, व आवश्यक साहित्याची खरेदी केली जाते. त्यासाठी ठेकेदाराकडुन जाहिर निविदा मागविल्या जातात. जाहिर निविदा मागविल्यानंतर मंजुर निविदा धारकास कार्यादेश देण्यापूर्वी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) (इ) नुसार संविदा तयार करुन त्या संविदेवर विभाग प्रमुखाची व स्थायी समिती २ सदस्यांची स्वाक्षरी झाल्यानंतर मनपा नगरसचिवाकडील सिल व स्वाक्षरी करणे आवश्यक असते.

परंतु सदर विभागाकडील संविदांवर (करारनामावर) विभागप्रमुख, स्थायी समिती २ सदस्य व नगरसचिवांकडील सिल व स्वाक्षरी केलेली दिसून येत नाही. ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

***आक्षेप क्र :- ०८***

मिरा भाईंदर महानगरपालिका शहर विकास आराखडयातील मंजुर विकास नियंत्रण नियमावली विनिमय क्रं. २२ नुसार मनपा कार्यक्षेत्रातील बांधकाम करणा-या विकास कर्त्यांना प्रस्तावित आर.जी.क्षेत्रामधुन १० % बांधकाम खालील क्षेत्र वगळुन उर्वरीत क्षेत्रासाठी प्रत्येक १०० मीटर करिता ५ झाडे लावणे आवश्यक केले आहे.

उक्त तरतुदीनुसार विकास कर्त्यांनी आर.जी. क्षेत्रानुसार आवश्यक झाडे लावुन झाल्यानंतर उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकडून ना हरकत दाखला देण्याची तरतुद केलेली आहे.

वरीलप्रमाणे वृक्षप्राधिकरण विभागाकडून ना हरकत दाखला देण्यात येतो. मात्र सदर दाखला दिल्यानंतर कोणत्याही प्रकारची 'फी' वसुल केली जात नाही.

तरी सदर दाखला देतांना वृक्षप्राधिकरण विभागाने ना हरकत दाखला देण्यासाठी इमारतींना भेटी देणे त्याकामी वापरण्यात येणारी प्रशासकीय यंत्रणा व स्टेशनरी साहित्य, वाहन इत्यादि वरील होणारा खर्च वसुल होणे आवश्यक आहे. यास्तव "ना हरकत" दाखला देते वेळी नाममात्र फी लागु केल्यास वृक्ष प्राधिकरण विभागास नाही प्रमाणात उत्पन्न मिळु शकेल. तरी "फी" लागु करणेबाबत प्रस्तावित करणेची आवश्यकता आहे.

## सन २००९-१०
## अग्निशमन विभाग

***आक्षेप क्र :- ०९***

सन २००९-१० या आर्थिक वर्षातील दि. १/४/२००९ ते ३१/३/२०१० कालावधीतील लेखे, नस्ती, प्रस्ताव, अभिलेखे लेखापरिक्षण करणे कामी तपासणीसाठी उपलब्ध करुन देणेबाबत लेखापरक्षिण विभागाकडून जा.क्र.मनपा/मुलेप/१५३/२००९-१० दि. २६/३/२०१० रोजी पत्र देण्यात आले होते. त्या अनुषंगाने दि. १२/५/२०१० रोजी प्राप्त झालेल्या रेकॉर्ड नुसार तपासणी केली असता खालीलप्रमाणे रेकॉर्ड.

अ.क्र १) अग्निशमन विभागाकडील वाहनांचे लॉगबुक नोंद रजिस्टर तपासणी करीता उपलब्ध केलेले नाही. त्यामुळे लेखापरिक्षण करता आले नाही.

२) निविदा, प्रस्ताव नस्ती, निविदा नोंद रजिस्टर तपासणी करिता लेखापरिक्षणास उपलब्ध केलेले नाही. त्यामुळे लेखापरिक्षण करता आले नाही.

३) कॅपीटेशन "फी" नोंद रजिस्टरचे लेखापरिक्षणासाठी तपासणी केली असता सदर रजिस्टर छापील नाही. तसेच रजिस्टरवर विभाग प्रमुखांनी स्वाक्षरी केलेली दिसुन येत नाही.

अग्निशमन विभागाकडुन देण्यात आलेली विविध नाहरकत दाखले, परवानाच्या मुळ नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळुन आलेली आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे.

१) ना हरकत दाखला जा.क्र.मनपा/अग्नी/४४/२००९-१० दि. ७/१०/२००९
श्रीम. अनिता राधेश सिंघानिया

२) ना हरकत दाखला जा.क्र.मनपा/अग्नी/४३/२००९-१० दि. ७/१०/२००९
श्रीम. महादेवी आर. सिंघानिया

३) नाहरकत दाखला जा.क्र.मनपा/अग्नी/३१/२००९-१० दि. ७/१०/२००९

श्री. ओमप्रकाश पटेल.

वरीलप्रमाणे फटाके विक्रीचा व्यवसाय करण्यासाठी दाखला देण्यापूर्वी संबंधितांकडून आवश्यक कागदपत्रांची मागणी केली जाते. त्यानंतर फाटाके विक्री साठी नाहरकत दाखले देण्याची तरतूद आहे.

वरील व्यावसायिकांकडून अर्जासोबत :-

१) चालु वर्षाची मालमत्ताकर भरणा केल्याची पावती.

२) ज्या जागेवर फटाके विक्री करावयाची आहे त्या ठिकाणी फायर एक्सस्टिंग्युशर ची व्यवस्था ठेवल्या बाबतचा दाखला जोडणे बंधणकारक केलेले होते.

सदर अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नसतांना देखील नाहरकत दाखले दिलेली आढळुन आलेली आहेत. उदा. मनपाचे मालमत्ता कर वसुली भरणा पावती / फायर एक्सस्टिंग्युशर ची व्यवस्था ठेवल्याबाबतचा दाखला जोडणे बंधनकारक केलेले होते.

मात्र संबंधीत अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नसतांना देखील नाहरकत दाखले देण्यात आलेली आहेत. त्यामुळे मनपाची कर भरणा पावती/फायर एक्सस्टिंग्युशर बसविल्या बाबतचा दाखला सादर केल्याशिवाय दाखले देणे कितपत योग्य आहे. याबाबत मनपाचे कर वसुली प्रभावीपणे होण्यासाठी उपलब्ध असलेल्या उपाय योजनांची पायमल्ली करून दाखले दिले जातात ही बाब मनपाच्या वसुलीवर विपरित परिणाम करणारी आहे.

याबाबत विभाग प्रमुखांकडून खुलासा मागविणे आवश्यक वाटते.

## सन २००९-१०
## परिवहन विभाग

**आक्षेप क्र :- १०**

सन २००९-१० आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ०९ ते जून ०९ कालावधीतील जमा-खर्च व बँकमेळ पत्रक तपासणी बाबत.

वरील विषया संदर्भात अंदाजपत्रक 'ब' नुसार मनपा परिवहन सेवेचे माहे एप्रिल २००९ ते जून २००९ या कालावधीचे हिशेबपत्रक व बँकमेळ पत्रक तपासणी करतेवळी खालीलप्रमाणे त्रूटी आढळुन आलेल्या आहेत.

१) परिवहन उपक्रमाचे कार्यालयीन दुरध्वनी व वाहतूक नियंत्रक चौकी वरील दुरध्वनीचे देयक मुदती पुर्वी भरणे आवश्यक होते. मात्र मुदत पूर्ण झाल्यानंतर देयके भरणा केल्यामुळे नाहक विलंब आकाराचा भूर्दंड खालीलप्रमाणे भरण्यात आलेला आहे.

माहे फेब्रुवारी १ ते २८/०२/२००९ कालावधी मधील दुरध्वनीचे देयके :-

| | | | |
|---|---|---|---|
| दुरध्वनी क्रमांक | १) | २८१७३०६५ | रु. २०/- |
| | २) | २८१७३०२५ | रु. १५०/- |
| | ३) | २८१८८६०० | रु. २०/- |
| | | | रु. १९०/- (विलंब आकार) |

रु. १९०/- विलंब आकार ज्यादा भरलेला आहे. विलंबाने भरण्याचे कारण काय आहे. याचे स्पष्टीकरण द्यावे.

२) दुरध्वनी क्रमांक २८१७३०२५ माहे मे. २००९ महिन्याचे देयक रु. ५०२३/- एवढे असुन या देयकामध्ये एस.टी.डी. व आय.एस.डी. चार्जेसचा समावेश आहे. तरी याबाबत वेळीच

दक्षता घेवुन दुरध्वनीचा वापरावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने संबंधितांनी खबरदारीचे उपाय योजून नियंत्रण ठेवणेची वेळीच दक्षता का घेतली नाही.

३) त्रैमासिक अहवाल माहे एप्रिल ०९ ते जून ०९ या कालावधीत फक्त रोकडवही/बँकबुक रजिस्टर लेखापरिक्षणासाठी उपलब्ध केलेले आहे. मात्र जमा वर्गीकरण/खर्च करण हे रजिस्टर सादर केलेली नाहीत. त्यामुळे जमा/खर्च वर्गीकरणाचा तपशील तपासणे शक्य झालेला नाही. संबंधित विभागाने जमा/खर्च वर्गीकरण का ठेवले नाही याचा खुलासा करावा.

४) मनपाकडुन परिवहन उपक्रमास स्वतंत्र्यपणे अनुदान दिले जाते. त्यासाठी स्वतंत्रपणे रजिस्टर ठेवलेले नसल्यामुळे, तपासणी करणे शक्य झालेले नाही.

***आक्षेप क्र :- ११***

सन २००९-१० या आर्थिक वर्षातील परिवहन उपक्रमाच्या लेख्यांची तपासणी केली आहे. त्याचा वस्तुनिष्ठ अहवाल खालीलप्रमाणे.

<u>वार्षिक उत्पन्न खर्चाचा तपशिल (ठळक बाबीवरील)</u>

| अ.क्र | 'अ' उत्पन्न (तपशिल) | एकुण रुपये |
|---|---|---|
| १ | बस तिकीट विक्री | ७,९५,८०,३०५/- |
| २ | विद्यार्थी पासभाडे | १३,५५,८१०/- |
| ३ | प्रवासी पास भाडे | ४४,११,१३५/- |
| ४ | विना तिकीट प्रवाश्यांकडुन दंड व वसुली | ५३.९२९/- |
| ५ | वाहनावरील जाहिरातीचे उत्पन्न | ५,७२,०००/- |
| ६ | बस थांब्यावरील जाहिरात | २,७९,५८०/- |
| ७ | निविदा अर्ज /फॉर्म फी | १,१४,१४५/- |
| ८ | ओळखपत्र विक्री | ३७,१५५/- |
| ९ | ठेकेदाराकडून दंडवसुली | ५,९२,३२७/- |
| | उत्पन्न एकुण | ८,६४,६३,२९६/- |

| अ.क्र | 'ब' उत्पन्न (तपशिल) | एकुण रुपये |
|---|---|---|
| १ | स्थायी वेतन | ३५.१४०/- |
| २ | अधिकारी वाहन खर्च | २,९६,८७०/- |
| ३ | भाडे तत्वावरील बसेसचे भाडे | ९,३४,७१,९०१/- |
| ४ | स्टेशनरी खर्च | ३,९२,६०३/- |
| ५ | कन्सल्टंट फी | ५,०७,०००/- |
| ६ | वाहन देखभाल/दुरुस्ती | १,१०,६७८/- |
| ७ | दुरध्वनी बील | ७१,५५२/- |
| ८ | विद्युत बील | १३,१७३/- |
| ९ | बँक चार्जेस | ११,६५०/- |
| १० | परिवहन समिती सदस्य मानधन | १,३०,०००/- |
| ११ | वाहन प्रवर्तक कर्मचारी वेतन | १,०९,२३,२३५/- |
| १२ | छपाई खर्च | ७,६०,२५०/- |
| १३ | किरकोळ / चौक्या दुरुस्ती खर्च | ४,११,९०३/- |
| | खर्च (एकुण) | १०,७२,१६,०२५/- |

- एकुण खंच - रु. १०,७२,१६,०२५/-
- एकुण उत्पन्न- रु. - ८,६४,६३,२९६/-

रु. २,०७,५२,७२९/-

उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झालेला असल्याने परिवहन उपक्रमास सन २००९-१० या वर्षात रु. २,०७,५२,७२९/- एवढे नुकसान झालेले आहे.

एकुण वार्षिक बसेस (धाव) कि.मी. ४१,८०,४००/-

- उत्पन्न प्रति कि.मी (Earning Per K.M) २०.६८/-
- खर्च प्रति कि.मी. (Cost Per K.M) २५.६५/-

खर्च प्रति कि.मी. २५.६५/-

उत्पन्न प्रति कि.मी -२०.६८/-

४.९७/- नुकसान प्रति कि.मी.

परिवहन उपक्रमाचे सन २००९-१० या आर्थिक वर्षातील लेख्यांची तपासणी केली असता असे दिसुन येते की परिवहन उपक्रम मिरा-भाईंदर शहरवासियांना अत्यावश्यक परिवहन सेवा पुरविण्याचे काम करीत आहे. हे करीत असतांना ही सेवा ना-नफा, ना-तोटा या तत्वावर चालणे अपेक्षीत आहे. परंतू वरील लेख्यांची तपासणी केली असता असे दिसुन येते की, मनपाला हि सेवा पुरवितांना प्रति कि.मी. मागे रु. ४.९७/- निव्वळ तोटा सोसावा लागत आहे.

सन २००९-१० या आर्थिक वर्षातील परिवहन उपक्रमाचे उत्पन्न खर्चाचे लेखापरिक्षणाअंती असे स्पष्ट होते की, मिरा-भाईंदर शहरवासियांना परिवहन सेवा पुरवितांना प्रत्येक कि.मी. मागे दररोज सरासरी रु. ५/- नुकसान सोसुन सेवा पुरविण्यात येत आहे. वास्तविक पाहता ही सेवा ना- नफा ना-तोटा (Break Even Point) पर्यंत नेण्यासाठी परिवहन उपक्रमाने कसोसीने प्रयत्न करणे जरुरीचे आहे. परंतु तसे न करता प्रति कि.मी. सरासरी दररोज रु. ५/- प्रमाणे तोटा सहन करुन सेवा पुरविली जात आहे. हि बाब चिंताजनक आहे.

परिवहन सेवा शहरवासियांना पुरवावयाची असल्यास ही सेवा महाराष्ट्रातील इतर मनपा परिवहन उपक्रमा सारखी रॉयल्टी बेसीस म्हणजेच प्रति किमी. मागे ठराविक ठोक रक्कम स्विकारुन खाजगी ठेकेदाराकडे सोपविणेचे प्रयत्न करावेत. यासाठी मनपा प्रशासनाने व परिवहन समितीने धोरणात्मक निर्णय घेवुन याबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे सद्यस्थितीतील बससेवा व **JNNURM** अंतर्गत पुरविण्यात येणा-या ५० बस गाडया देखील बस सेवा सुरु करण्यापुर्वी योग्य अभ्यास पुर्ण माहिती घेवुन इतर मनपा परिवहन उपक्रमांकडील माहितीचा आधार घेवुन खाजगी ठेकेदारामार्फत रॉयल्टी बेसीस वर शहरवासियांना परवडेल अशा योग्य दराने बस सेवा पुरविण्याची नितांत गरज आहे. किवा प्रवाशी तिकीटांचे दर वाढविणे गरजेचे आहे. अन्यता मनपा परिवहन उपक्रम आर्थिक संकटात येवुन परिवहन सेवा बंद करावी लागेल.

जर परिवहन सेवा यापुढे चालवावयाची असल्यास मनपास प्रति कि.मी रु. ५.००/- नुकसान सहन करुन सेवा चालवावी लागणार आहे. JNNURM अंतर्गत उपलब्ध होणा-या बसेसची सेवा रॉयल्टी बेसीसवर चालविल्यास परिवहन उपक्रमास कोणत्याही प्रकारची गुंतवणूक न करता प्रति कि.मी मागे दर निश्चित करुन ठोक रक्कम मिळेल. तरी याबाबत परिवहन उपक्रमाणे धोरणात्मक निर्णय घेवून परिवहन उपक्रम चालविणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक वाटते.

## सन २००९-१०
## बांधकाम विभाग

### आक्षेप क्रं. १२:-रिलायन्स एनर्जी लि.कंपनीच्या मालमत्ता/विजबिलाचा भरणा करणेबाबत खालील त्रूटी आढळून आल्या.

उपरोक्त बिलामध्ये काही ठिकाणची कॅटेगरी रेसीडेंशीयल (घरगुती) तर काही ठिकाणची (व्यापारी) दराने आकारणी केली आहे. सदरची आकारणी कशाप्रकारे केली याचा बोध होत नाही. तलाव, रस्ते, उद्याने येथे देखील कर्मशियल दराने बिलाची आकारणी झालेली आहे. याबाबत खुलासा व्हावा. तसेच वीज बचतीकरिता कमी व्होल्टेजचे दिवे असल्यास वीज देयकात चांगलीच बचत होईल.

### आक्षेप क्रं.१३ :- वीज देयकांबाबत.

सदरची देयके मुख्य कार्यालयास अत्यंत उशिरा प्राप्त होतात तरी संबंधितांना ही देयके लवकरात लवकर मुख्य कार्यालयास देण्याबाबतच्या सुचना देणे जरूरीचे आहे.

### आक्षेप क्रं. १४ :- विकास कामांबाबत. मालमत्तेची वार्षिक पडताळणी..

बांधकाम विभागाकडून निविदा सूचना प्रसिध्द करताना कामास व्यापक प्रसिध्दी मिळावी म्हणून कामाच्या मुल्याप्रमाणे वर्गीकृत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यांत यावी जेणेकरुन दरांमध्ये व्यापक स्पर्धा होईल.

आक्षेप क्रं. १५ :- मालमत्तेची वार्षिक पडताळणी..

बांधकाम विभागाने महानगरपालिकेकडे असलेल्या मालमत्ता व जमिनीची वित्तीय वर्षा अखेर मालमत्तांची पडताळणी करणे आवश्यक आहे. तसेच बांधकाम विभागातील मालमत्तांची किंमत व लेखा शाखेतील नोंदी प्रमाणे असलेली किंमत हयांचा ताळमेळ घालण्यात यावा.

आक्षेप क्रं. १६ :- अर्थसंकल्प सन २००९-१० मध्ये खर्च न पडलेले लेखाशिर्ष.

| अ.क्र | लेखाशिर्ष | तरतुद | शिल्लक |
|---|---|---|---|
| १ | फर्निचर देखभाल दुरुस्ती | 1,00,000/- | 1,00,000/- |
| २ | नाका बांधणे व त्याची दुरुस्ती / फर्निचर खर्च | 5,00,000/- | 5,00,000/- |
| ३ | श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरण (सार्व. उद्याने) | 5,00,000/- | 5,00,000/- |
| ४ | घनकचरा व्यवस्थापन रस्ते बांधकाम | 5,00,000/- | 5,00,000/- |
| ५ | हॉस्पीटल बांधणे (आमदार निधी) | 25,00,000/- | 25,00,000/- |
| ६ | कत्तलखाने | 50,000/- | 50,000/- |
| ७ | मार्केट बांधकाम | 525,00,000/- | 525,00,000/- |
| ८ | महापौर/आयुक्त/पदाधिकारी/अधिकारीनिवास | 5,00,000/- | 5,00,000/- |
| ९ | तळी, विहीरी दुरुस्ती | 1,00,000/- | 1,00,000/- |
| १० | वाचनालय विकास | 1,00,000/- | 1,00,000/- |

उपरोक्त लेखाशिर्षामध्ये सौरउर्जा हा प्रकल्प वेळीच राबविल्यास पथ दिव्यातील देयकामध्ये लक्षणीय बचत होउन सदरच्या निधीचा वापर महानगरपालिकेला इतर विकास कामांसाठी त्याचा वापर करता आला असता. सदरच्या निधींचा वापर महानगरपालिकेला इतर विकास कामांसाठी त्याचा वापर करता येऊ शकला असता.

## सन २००९-१०
## जकात विभाग.

**आक्षेप क्रं. :- १७**

जकात विभागाद्वारे सन २००९-१० या वित्तीय वर्षामध्ये जकात चुकविगेरीची प्रकरणे शोधण्यात आली असून दंडापोटी रु.२,२३,३६३/- नाममात्र रक्कम वसून करण्यांत आली आहे. सोबत विवरणपत्र जोडण्यात आले आहे. वास्तविक मनपा क्षेत्रामध्ये यापेक्षा कितीतरी प्रमाणात कर चूकविगेरीची प्रकरणे असण्याची शक्यता आहे. परंतु जकात विभागाने भरारी पथक न नेमल्याने मनपाचा महसूल बुडालेला आहे. तरी जकात विभागाने अदयाप भरारी पथक का नेमण्यात आले नाही याची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

**आक्षेप क्रं. :- १८**

संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना दि. १८/०३/२००९ मध्यरात्री पासून ते दि. ३१/०३/२०१० मध्यरात्री पर्यंत जकात वसुलीचा ठेका मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना देण्यात आलेला आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांनी अनियमितपणे जकात हप्ता मनपा कार्यालयाकमध्ये भरणा केल्याने करारनाम्यातील अटिशर्तीनुसार त्यांचेकडून दंडापोटी रु. ५६,०१२/- मात्र (अक्षरी रुपये छपन्न हजार बारा मात्र) वसूल होणे आवश्यक आहे. तसेच सदरची रक्कम महालेखापाल याचे लेखापरिक्षकांच्या अधिन राहून कळविण्यात येत आहे. सदरची रक्कम जकात विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या नोंदीवरुन परिगणित करण्यात आली आहे.

जकात कर उशिराने भरल्यामुळे देय होणा-या व्याजाच्या रक्कमेचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | हप्ता क्रं. | कालावधी | हप्ता रक्कम | हप्ता रक्कम भरल्याचा दिनांक | उशिराने रक्कम भरल्याचे दिवस | २०% वार्षिक दराने व्याज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६ | दि. २४/०४/०९ ते दि. ३०/०४/०९ | १,७०,३७,०२९/- | दि. २.५.०९ | २ दिवस | १८,३७१/- |
| २ | ४७ | दि. १२/०२/१० ते दि. १८/०२/१० | १,७०,३७,०२९/- | दि. २२.२.१० | ४ दिवस | ३७,३४१/- |
| | | | | | एकूण व्याजाची रक्कम रु. | ५६,०१२/- |

## जकात दंड वसुली रक्कम

| अ.क्र | दिनांक | पावती क्रं. | आयातकाचे नांव | करपात्र वस्तु | वाहन किंवा बोजाचा प्रकार | किंमत मुल्य | जकातीचा मुल्य | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २५/०५/०९ | ८२०००१ | सुपर इनफेक्स | एस.एस.भांडी | HR 55 /5304 | ३८७८४ | २% | ७७५० |
| २ | २९/०५/०९ | ८२०००२ | जनार्दन इंजी. | एस.एस.रॉड | MH04/JK9517 | ३५००० | २% | ७००० |
| ३ | २१/०७/०९ | ८२०००३ | स्वेुअर ऑटो मेन्सन | इलेट्रॉनीक्स सामान | MH02/AY 653 | २३५००० | ३% | ७०५०० |
| ४ | २२/०७/०९ | ८२०००४ | लक्ष्मी प्लाझा | किचन वेअर | MH02/JP 7523 | ३०००० | ३% | ९००० |
| ५ | ३०/०७/०९ | ८२०००५ | मनोज इंटर प्राईज | इलेक्ट्रॉनीक्स सामान | MH05/S-555 | १६६६६ | ३% | ५००० |
| ६ | ०३/०८/०९ | ८२०००६ | श्री. संतोषदेवराम गंजाडे | केमीकल | टॅक्सी | ३००० | ३% | ९०० |
| ७ | ११/०८/०९ | ८२०००७ | एस.एस.इंटर प्राईज | इलेट्रॉनीक्स सामान | रिक्षा | १३००० | ३% | ३९०० |
| ८ | १२/०८/०९ | ८२०००८ | उडपी स्टोअर्स | किचन वेअर्स | MH04/DD-701 | १५००० | ३% | ४५०० |
| ९ | १८/०८/०९ | ८२०००९ | भवानीइंटर प्राईज | मिक्सर नग. १० | MH02/AX-6917 | १०००० | ३% | ३००० |
| १० | २१/०८/०९ | ८२००१० | स्वेअर ऑटो मेशन | इलेक्ट्रॉनीक्स सामान | MH02/AY653 | ५००० | ३% | १५०० |
| ११ | २५/०८/०९ | ८२००११ | एच.एच.कलेन्स् | कपडा | MH04/DS 5795 | ९०९० | २% | १८२० |
| १२ | २६/०८/०९ | ८२००१२ | इलेट्रॉनिगम इन्फ्रा लि. | इलेट्रॉनीक्स सामान | MH04/AR-8327 | ६००० | २% | ३००० |
| १३ | ०२/०९/०९ | ८२००१३ | फोरेक्स जमार | कपडा | MH04/CA-8354 | १७१६५ | २% | ३४३३ |
| १४ | ०९/०९०९ | ८२००१४ | न्युज प्रेक्षी | कपडा | MH04/AL 2179 | ३०००० | २% | ६००० |
| १५ | १०/०९/०९ | ८२००१५ | शिवम कलेक्शन | कपडा | MH04/CO-5525 | ९०००० | २% | २००० |
| १६ | १२/०९/०९ | ८२००१६ | हिना कलेक्शन | कपडा | MH04/CA-5630 | ५०००० | २% | १०००० |
| १७ | १५/०९/०९ | ८२००१७ | रिलयन्स मनो. क. | पॅनेक बोईस | MHOG/EB-449 | ९००० | ३% | २७०० |
| १८ | ३०/१०/०९ | ८२००१८ | शिवम कलेक्शन | कपडा | MH04/CU-449 | ९००० | ३% | २७०० |
| १९ | ०७/११/०९ | ८२००१९ | रवि इंन्ड. | लिप्टमार्ट | MHO4/N-8281 | ११४०० | ३% | ३४२० |
| २० | १२/१२/०९ | ८२००२० | श्री. संजय पारेख | एल.सी.डी. टिव्ही | MH03/F-8793 | ३६००० | ३% | १०८०० |
| २१ | १६/१२/०९ | ८२००२१ | श्री. जगदीश आर विर्षोर | एस.एस. फोजीग तुकडा | MHO4/EB-1534 | १८९८०० | २% | ३७९६० |
| २२ | १७/१२/०९ | ८२००२२ | श्री.सचीन कागणे | इलेट्रीक सामान | स्वत: | १३२७३ | ३% | ३९८० |
| २३ | २३/१२/०९ | ८२००२३ | मे.श्री. बालाजी इंडस्ट्रीज | एस.एस.शिट (मशिन पार्टस) | MHO2/AL-4012 | ७५००० | ३% | २२५०० |
| | | | | | | | एकुण | २,२३,३६३ |

## सन २००९-१०
## नगररचना विभाग

**आक्षेप क्र १९ :- विकास आकार बाबत...**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील प्रकरण सहा 'अ' मधील नियम १२४ अ ते १२४ एल अन्वये विकास आकार बसविणे त्याची आकारणी व वसुली बाबत तरतुदी दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने मनपा 'विकास आकार' वसुली बाबत अंमलबजावणी करीत असते.

सन २००९-१० या वित्तीय वर्षासाठी इमारत परवाना फी विकास आकारासाठी अर्थसंकल्पामध्ये रक्कम रु. १३०० लाख तरतुद असताना रक्कम रु. १३७६.५४ लाख एवढी वसुली झालेली आहे. याचा अर्थ तरतुद ही वास्तवाशी धरुन नाही.

विकास आकार हे मनपाचे प्रमुख उत्पन्न आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न व वाढता खर्च विचारात घेता मनपास उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे. मिरा भाईंदर मनपाचा विकास दर हा फार कमी असून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विकास दर वाढविणे आवश्यक आहे.

सबब विभागप्रमुखांनी योग्य ती कार्यवाही करावी.

**आक्षेप क्रं. २० :- विभागामार्फत मिळणा-या उत्पन्नाबाबत...**

मिरा भाईंदर मनपा क्षेत्रातील आरक्षित असलेल्या जमिनीवर संबंधितांना टी.डी.आर (Transferable Development Rights) दिलेल्या सन २००९-१० या वित्तीय वर्षात टी.डी.आर ने भरणा केलेली रक्कम रु. १५४९७२१/- इतकी आहे. सन २००९-१० हया अर्थसंकल्पात टी.डी.आर लेखाशिर्षांतर्गत रु.३ कोटी ची तरतुद ठेवलेली आहे. यावरुन टी.डी.आर अंतर्गत वसुल झालेले उत्पन्न हे फारच कमी प्रमाणात असल्याचे निष्पन्न होते.

सबब, विभागप्रमुखांनी योग्य ती कार्यवाही करावी.

*आक्षेप क्रं. २१ :- विभागातील कामकाजबाबत...*

सन २००९-१० हया वित्तीय वर्षातील नगररचना विभागाचे लेखापरिक्षणासाठी जा.क्र.मनपा/अंलेप/२२/२०१०-११ दि. ७/४/१० अन्वये खालील मुदयांची माहिती देणेबाबत सदर विभागाशी पत्रव्यवहार करणेंत आलेला होता.

१) सन २००९-१० हया वित्तिय वर्षातील विकास आकार, बाल्कनी बंदिस्त फी, दंडनीय शुल्क व इतर वसुली हयांचे विवरणपत्र देणेंत यावे.

२) सन २००९-१० हया वित्तीय वर्षात टी.डी.आर. ने भरणा केलेली रक्कम किती आहे?

३) बीओटी तत्वावर असलेल्या जागा किती ?

४) किती आरक्षित जागा भाडेतत्वावर दिलेल्या आहेत?

५) हस्तांतरीत झालेल्या जागांपैकी किती जागा मनपाने ताब्यात घेतलेल्या आहेत?

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची प्रकरण ३ मधील नियम ६ व ७ नुसार लेखापरिक्षणाबाबत विनाविलंब दप्तर उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

*उक्त नियमाच्या तरतुदीनुसार विभागप्रमुखांनी कार्यवाही केलेली नाही.*

## सन २००९-१०
## वाहन विभाग

### आक्षेप क्रं. २२ :- इंधन खर्चाबाबत...

सन २००९-१० हया वित्तीय वर्षात मनपाकडे मोठी ३९ व लहान ४२ असून एकूण ८१ वाहने कार्यरत आहेत. त्यापैकी २२ वाहने बंद स्थितीत आहेत. मनपाकडील सामान्य प्रशासन, कर विभाग, अग्निशमन विभाग, आरोग्य विभागातील वाहनांसाठी इंधनावरील खर्च रु. ५६,१८,७७९/- इतका झालेला आहे. सदर खर्च हा मोठया प्रमाणावर झालेला दिसून येत आहे.

सबब, सदर खर्चावर विभाग प्रमुखांनी नियंत्रण ठेवणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

### आक्षेप क्रं. २३ :- खाजगी वाहन भाडयावरील खर्चाबाबत...

सन २००९-१० हया वित्तीय वर्षामध्ये मनपाच्या विविध विभागातील अधिकाऱ्यांना व विभाग प्रमुखांना खाजगी वाहन पुरवठा केलेला आहे. सदर खाजगी वाहन भाडयावरील एकूण खर्च रु. ५५,७३,८५९/- इतका झालेला दिसून येतो. तसेच खाजगी ठेका वाहन चालक पुरवठा केल्याचा खर्च रु.४३,१६,९६३/- इतका झालेला आहे.

खाजगी वाहन भाडे खर्च तसेच खाजगी ठेका वाहनचालकाचा खर्च मोठया प्रमाणावर होत आहे. सदर खर्चावर वाहन विभाग प्रमुख हयांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे.

सबब योग्य ती कार्यवाही करावी.

## सन २००९-१०
## अतिक्रमण विभाग

### आक्षेप क्रं. २४ :- अनधिकृत अतिक्रमण बांधकाम तोडणेचे चार्जेस बाबत...

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार व मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २६०(२) व २६४ (३) अन्वये अनधिकृत व अतिक्रमण तोडण्यात आलेल्या बांधकामाचा खर्च बांधकामाचे मालक किंवा भोगवटादार यांचेकडुन वसूल करणेबाबत तरतुद आहे.

सन २००९-१० हया वित्तीय वर्षात अतिक्रमण विभागाने निष्काशीत केलेल्या बांधकामांचा खर्च अनधिकृत बांधकाम करणा-या संबंधित व्यक्तीकडून वसुल करणे क्रमप्राप्त आहे. त्याकरिता अर्थसंकल्पात उक्त लेखाशिर्षातर्गत रक्कम रु. १ कोटीची तरतूद आहे. सदर वर्षात विभागाकडून रु. २.०० लाख एवढी वसुली करणेंत आलेली आहे. यावरुन निष्काशित केलेल्या बांधकामाच्या वसुलीचा खर्च अधिनियमातील तरतुदीनुसार सदर विभागाने वसुली केलेली नसल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

सदर प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेवून विभागप्रमुखांनी उक्त लेखाशिर्षातर्गत चार्जेस वसुलीबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

### आक्षेप क्रं. २५ :- जप्ती व दंड वसुलीबाबत...

महाराष्ट्र नगरपरिषद लेखांसहिता १९७१ मधील नियम क्रं. ७८(३)७९ नुसार जप्ती व दंड वसुली रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. सदर रजिस्टर तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही.

मनपाच्या विविध विभागात ना फेरीवाले क्षेत्रातील अतिक्रमणे करणा-या फेरीवाल्यांकडून अतिक्रमण जप्ती व दंड वसुली केली जाते. सन २००९-१० हया वित्तीय वर्षात उक्त लेखाशिर्षातर्गत अर्थसंकल्पीय तरतुद रु. २५ लाख एवढी आहे. लेखाविभागातील नमुना नं.२४ (जमा वर्गीकरण) नुसार सन २००९-१० मध्ये रु. २८८५०/- एवढी वसुली झालेली

आहे. अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार जमा होणारी रक्कम व वसुल झालेली रक्कम हयात फार मोठी विसंगती आढळते. एकतर तरतुद वास्तवाशी धरुन नाही किंवा उक्त लेखाशिर्षातर्गत अत्यंत कमी प्रमाणात वसुली झालेली आहे.

विभागप्रमुखांनी उक्त लेखाशिर्षातर्गत वसुली वाढविणे आवश्यक आहे. सबब योग्य ती कार्यवाही करावी.

*आक्षेप क्रं. २६ :- विभागातील कामकाजबाबत...*

सन २००९-१० हया वित्तीय वर्षातील अतिक्रमण विभागांचे लेखापरिक्षणांसाठी खालील मुद्यांची माहिती देणेबाबत विभागाशी पत्रव्यवहार करणेंत आलेला होता.

१) BPMC ACT १९४९ चे कलम २६०(२) व २६७ (३) अन्वये सन २००९-१० हया वित्तीय वर्षात अनधिकृत बांधकामे तोडण्यासाठी मनपास येणारा खर्च संबंधित व्यक्ती कडून वसुल केलेले अभिलेख उपलब्ध करुन दयावे.

२) सन २००९-१० हया वित्तीय वर्षात किती अनधिकृत बांधकामांना नोटीसा बजावलेल्या आहेत?

३) नोटीसा बजविल्या प्रकरणांपैकी किती बांधकामे निष्काशीत केली गेली ?

४) निष्काशीत केलेली मोठी एकूण बांधकामे व एकूण अतिक्रमणे हयांची संख्या.

५) नोटीसा बजावलेल्या प्रकरणापैकी न्यायप्रविष्ठ प्रकरणे.

६) प्रत्येक वर्षात निष्काशीत केलेली एकूण अनधिकृत अतिक्रमणे बांधकामे.

मुंबई प्रांतीक महापालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची प्रकरण ३ मधील नियम ६ व ७ नुसार लेखापरिक्षणाबाबत विनाविलंब दप्तर उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

उक्त नियमाच्या तरतुदी नुसार विभागप्रमुखांनी कार्यवाही केलेली नाही.

# आस्थापना विभाग

## आक्षेप क्रं. २७ :- सेवा पुस्तकातील अपुर्ण नोंदी बाबत...

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील प्रकरण ४ अन्वये सेवानोंदी ठेवणे आवश्यक आहे. उक्त नियमात नमुद केल्यानुसार सन २००९-१० हया वित्तिय वर्षाच्या अखेरीस काही कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची पडताळणी केली असता सेवापुस्तकाच्या पहिल्या पानावर संबंधित कर्मचा-याची जन्म तारखेची नोंद घेतलेली नाही. तसेच सक्षम अधिकारी हयांची स्वाक्षरी नसल्याचे निदर्शनास आले. उदाहरणादाखल काही कर्मचा-यांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कर्मचा-यांचे नांव | हुद्दा | आक्षेप |
|---|---|---|---|
| १ | श्री. छीन्नावण अरुणासलम | स.का | जन्मतारीख, सक्षम अधिका-याची स्वाक्षरी व वैदयकिय प्रमाणपत्र नाही. |
| २ | श्री. सुब्राम्हण्यम पावाडे | --//-- | --//-- |
| ३ | श्री. माधु सित्तम | --//-- | --//-- |
| ४ | मशरूलाल प. धाऊ | --//-- | --//-- |
| ५ | सुखदेव खरात | --//-- | --//-- |
| ६ | सरोजा सुंदरवडीवेल | --//-- | --//-- |
| ७ | रत्नादेवी रा. सौदा | --//-- | --//-- |
| ८ | हिरा मा. डांगर | --//-- | --//-- |
| ९ | मिना नायर | --//-- | --//-- |
| १० | कुटुमणी विरास्वामी | --//-- | --//-- |
| ११ | शिवा जाधव | --//-- | --//-- |
| १२ | ओमप्रकाश गोसाई | --//-- | --//-- |
| १३ | बालराज आरमुगम | --//-- | --//-- |
| १४ | अंजामणी मायावन | --//-- | --//-- |
| १५ | अर्जुन मथुराम | --//-- | --//-- |
| १६ | बाबर काटा सोलंकी | --//-- | --//-- |
| १७ | विरमतु छलन | स.का | जन्मतारीख, सक्षम अधिका-याची स्वाक्षरी व वैदयकिय प्रमाणपत्र नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | रॉयर मायावन | --//-- | --//-- |
| १९ | रामलिंगम लक्ष्मणवन | --//-- | --//-- |
| २० | राजा मुर्ति | --//-- | --//-- |
| २१ | गणेशन मुर्ती | --//-- | --//-- |
| २२ | बाबु कर्पस्वामी | --//-- | --//-- |
| २३ | पेरूमल परमशिवम | --//-- | --//-- |
| २४ | शशिकांत आव्हाड | --//-- | --//-- |
| २५ | आरमुगम मणिकम | --//-- | --//-- |
| २६ | दोराईराज रामानुजम | --//-- | --//-- |
| २७ | सुब्रामण्यम कर्पनन | --//-- | --//-- |
| २८ | तारा ल चंडालिया | --//-- | --//-- |
| २९ | आरसन अनमलाई | --//-- | --//-- |
| ३० | देवसमुतु | --//-- | --//-- |
| ३१ | आरमुगम मोटीयन | --//-- | --//-- |
| ३२ | गौतम आहिरे | --//-- | --//-- |
| ३३ | प्रदीप वा. पाटील | --//-- | --//-- |
| ३४ | मुगोदया अर्जुन | --//-- | --//-- |
| ३५ | सुरेश मगन | --//-- | --//-- |
| ३६ | राधाबाई तु.पाटील | --//-- | --//-- |
| ३७ | तुंगामणी अरूणासलम | --//-- | --//-- |
| ३८ | मणविले मायावन | --//-- | --//-- |
| ३९ | मटराजन रवित्तम | --//-- | --//-- |
| ४० | बाबु जेस्टीन | --//-- | --//-- |
| ४१ | रमेश लोखंडे | --//-- | --//-- |
| ४२ | कालिमुर्ती विरन | --//-- | --//-- |
| ४३ | पेलु सिन्हास्वामी | --//-- | --//-- |
| ४४ | मुरूगम रामबुप्पु | --//-- | --//-- |
| ४५ | बाबाराम शेडके | --//-- | --//-- |
| ४६ | ठंडापानी अरमुगम | --//-- | --//-- |
| ४७ | लक्ष्मण नावान | --//-- | --//-- |
| ४८ | राजु रामस्वामी | --//-- | --//-- |
| ४९ | रामलिंगम नडेसन | --//-- | --//-- |
| ५० | बाबु सुकुर राठोड | --//-- | --//-- |
| ५१ | आरमुगम कांत्र | --//-- | --//-- |
| ५२ | पावाडे कुमारस्वामी | स.का | जन्मतारीख, सक्षम अधिका-याची स्वाक्षरी व वैदयकिय प्रमाणपत्र नाही. |
| ५३ | पेरिअप्पन कंदरवेल | --//-- | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५४ | विरमपाल रघुनाथ | --//-- | --//-- |
| ५५ | कांतीमुर्ती रामस्वामी (सदर गृहस्थ फोटोमध्ये वयस्क वाटत आहेत.) | --//-- | --//-- |
| ५६ | स्वामीला नमप्पा | --//-- | --//-- |
| ५७ | रामस्वरुप टाक | --//-- | --//-- |
| ५८ | विश्वनाथ मोरेश्वर पाटील | --//-- | --//-- |
| ५९ | शिला रामअवतार गोसाई | --//-- | --//-- |
| ६० | कांता गोपाळ सोलंकी | --//-- | --//-- |
| ६१ | छल्लन आरमुगम | --//-- | --//-- |
| ६२ | हरीश चेनन चनाल | --//-- | --//-- |
| ६३ | विरमणी कोलंजी | --//-- | --//-- |
| ६४ | समाधान च. त्रिभुवन | --//-- | --//-- |
| ६५ | गोविंदन एस. के. रंगनाथन | --//-- | --//-- |
| ६६ | चिन्नपुन सनमुगम | --//-- | --//-- |
| ६७ | गणेशन अनजक | --//-- | --//-- |
| ६८ | रशिदा पणण | --//-- | --//-- |
| ६९ | येडु माठई तंगवेल | --//-- | --//-- |
| ७० | सयकेल केशवन | --//-- | --//-- |
| ७१ | त्रिभुवन सोलंकी | --//-- | --//-- |
| ७२ | रामु आदिनलम | --//-- | --//-- |
| ७३ | विनोद महादेव भोईर | लिपिक | --//-- |
| ७४ | रमेश काना सोलंकी | स.का | --//-- |
| ७५ | शामलाल कोटीयाना | --//-- | --//-- |
| ७६ | नरेश चंडालिया | --//-- | --//-- |
| ७७ | नमार ईश्वर | --//-- | --//-- |
| ७८ | तांबाराम काशी | --//-- | --//-- |
| ७९ | वामन लक्ष्मण तुंबडा | --//-- | --//-- |
| ८० | कनु सोमा | --//-- | --//-- |
| ८१ | दिनेश गोयल | --//-- | --//-- |
| ८२ | ईश्वर प्रेम | --//-- | --//-- |
| ८३ | पुबदि चित्तन | --//-- | --//-- |
| ८४ | रमण मणी सोलंकी | --//-- | --//-- |
| ८५ | मिलन पांडुरंग म्हात्रे | --//-- | --//-- |
| ८६ | रेखा कुंभारे | लिपिक | जन्मतारीख, सक्षम अधिका-याची स्वाक्षरी व वैदयकिय प्रमाणपत्र नाही. |
| ८७ | विठ्ठलभाई मिठाभाई | स.का | --//-- |
| ८८ | मनुभाई खा. सोलंकी | --//-- | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ८९ | वासु पलानी | --//-- | --//-- |
| ९० | भिवा मनु सोलंकी | --//-- | --//-- |
| ९१ | दत्तु भाऊ वेहेले | शिपाई | --//-- |
| ९२ | विश्वभारती चहांदे | ग्रंथपाल | --//-- |
| ९३ | संदिल बाळकृष्णन | स.का | --//-- |
| ९४ | अनिल अं. कवडे | शिपाई | --//-- |

उपरोक्त कर्मचा-यांच्या नेमणुकीपासून अदयापपर्यंत कर्मचा-यांचे सेवा पुस्तकांच्या नोंदी घेतलेल्या नसल्याचे दिसून येते. तसेच जन्मतारखेची नोंद नसल्याने त्यांची सेवानिवृत्ती योग्य वेळी करणे अडचणीचे ठरणार आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ अन्वये प्रकरण ४ मधील कलम ३८ अन्वये कार्यवाही करावी.

**आक्षेप क्रं.२८ :- सन २००४-०५, २००५-०६, व २००६-०७ या वित्तिय वर्षातील वार्षिक लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांबाबत.**

सन २००४-०५ व २००५-०६ या वित्तिय वर्षातील वार्षिक लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांची पूर्तता करणेंत आलेली नाही. सन २००६-०७ हया वित्तीय लेखापरिक्षण अहवालातील आक्षेप क्रं. १० ची पूर्तता करणेंत आलेली नाही.

मा. स्थायी समिती सभा दि. ३/२/०७ ठराव क्रं. १८६ अन्वये वार्षिक लेखापरिक्षण अहवालातील काढलेल्या आक्षेपांची पूर्तता संबंधित विभागाने तात्काळ करून तसा अनुपालन अहवाल सादर करणेबाबत तरतुद आहे.

उपरोक्त तरतुदीनुसार आक्षेपांचे अनुपालन करणे संबंधित विभागप्रमुखांमार्फत कार्यवाही करणेत आलेली नाही.

## सन २००९-१०
## भांडार विभाग

### आक्षेप क्रं. २९ :- विभागीय कामकाजाबाबत...

सन २००९-१० या वित्तीय वर्षातील भांडार विभागाचे लेखापरिक्षणासाठी जा.क्र/मनपा/मुलेप/२७/२०१०-११ दि. ८/४/२०१० रोजी खालीलप्रमाणे दप्तर उपलब्ध करुन देणेबाबत कळविणेंत आलेले होते.

१) घसारा नोंदवही जंगम मालमत्ता नोंदवही.

२) सन २००९-१० चे साठा रजिस्टर.

३) सन २००९-१० या वित्तीय वर्षातील मंजूर केलेल्या निविदा फाईल, दरपत्रके फाईल.

उपरोक्त दप्तर भांडार विभागाने तपासणीकरीता उपलब्ध करुन दिले नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) नुसार लेखापरिक्षण करणे करीता विभागाने दप्तर उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाचे याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

सबब विभागप्रमुखाने याबाबतचा स्पष्ट खुलासा करावा.

<u>सन २००९-१०</u>

## सुवर्ण जयंती विभाग

***आक्षेप क्रं. ३० :- व्यवसाय कर रक्कम कपातीबाबत...***

सुवर्ण जयंती योजने अंतर्गत ठोक मानधनावर नऊ बालवाडी शिक्षिका कार्यरत असुन त्यांना दि.१/१२/२००८ ते ३१/१२/२००८ या कालावधी मधील दिलेल्या मानधनातुन व्यवसाय कर रक्कम कपात केली नाही.

तरी संबंधित नऊ बालवाडी शिक्षिका यांचे वेतनातून दि.१/१२/२००८ ते ३१/१२/२००८ पर्यंत प्रत्येक रु. १२०/- प्रमाणे व्यवसाय कर रक्कम कपात करुन शासनास त्वरीत भरणा करणेबाबत संबंधित विभाग प्रमुखाने कार्यवाही करावी.

## सन २००९-१०
## भाईंदर (प.) कर विभाग

***क्षेप क्रं. ३१ :- सन २००५-०६ व २००६-०७ हया वार्षिक लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांबाबत...***

सन २००५-०६ या वित्तिय वर्षातील वार्षिक अहवालातील प्रकरण क्रं. ०८ कर विभाग परिच्छेद क्रं. १३ मधील आक्षेपांचे अनुपालन केलेले नाही. सन २००६-०७ हया वित्तिय वर्षातील वार्षिक अहवालातील आक्षेप क्रं. ४९ चे अनुपालन केलेले नाही.

मा. स्थायी समिती सभा दि. ३/२/२००७ ठराव क्र. १८६ नुसार वार्षिक अहवालातील काढलेल्या आक्षेपांची पूर्तता एक महिन्याच्या आंत करणेबाबत ठराव पारीत झालेला आहे. तसेच जा.क्रं.मनपा/मुलेप/३६/१०-११ दि. २१/४/२०१० रोजी सदर आक्षेपांचे अनुपालन करणेबाबत संबंधित विभागप्रमुखांना पत्रव्यवहार करणेंत आलेला आहे. परंतु सदर आक्षेपांचे अनुपालन करणेत आलेले नाही.

***आक्षेप क्रं. ३२ :- अस्तित्वात नसलेल्या मालमत्ता/तोडलेल्या/दुबार नोंद मालमत्तेची कर आकारणी निर्लेखीत प्रकरणाबाबत...***

भाईंदर (प) कर विभागाकडून सन २००९-१० हया वित्तीय वर्षात भाईंदर (प) कर विभागातील झोन क्रं. अे,बी,सी मधील एकूण १३५ प्रकरणे निर्लेखित रक्कम करणेसाठी लेखापरिक्षण विभागास प्राप्त झालेवरुन ५२ ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असता काही मालमत्ता जागेवर अस्तीत्वात असलेचे निदर्शनास आले. संबंधित मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरण्यास सांगितले असता त्यांनी दि. ३१/७/०९ रोजी सन २००८-०९ पर्यंत मालमत्ता कर रक्कम रु. ७४७९/- भरणा केलेली आहे.

मालमत्ता अस्तित्वात असताना ती अस्तित्वात नसुन सदर मालमत्ता कर निर्लेखित करणेकरिता प्रस्ताव पाठविणे ही गंभीर बाब आहे. निर्लेखित करणेकामी पाठविलेल्या प्रकरणांमध्ये अशा प्रकारची मालमत्ता करांची वसुली होण्याची शक्यता नाकारता

येत नाही. त्याकरिता संबंधित अधिका-यांनी निर्लेखित प्रकरणाच्या प्रत्यक्ष जागेवर जाऊ न पाहणी करणे आवश्यक आहे.

सबब, पुढील योग्य ती कार्यवाही करणेंत यावी.

***आक्षेप क्रं. ३३ :- विभागीय कामकाजाबाबत...***

सन २००९-१० हया वित्तीय वर्षातील भाईंदर (प) कर. विभागांचे लेखापरिक्षणांसाठी जा.क्र/मनपा/मुलेप/४२/१०-११ दि. १८/५/२०१० अन्वये खालीलप्रमाणे दप्तर उपलब्ध करुन देणेबाबत पत्रव्यवहार करणेत आलेला होता.

१. सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे मागणी रजिस्टर नोंद वही.
२. सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे तेरिज/बेरिज (वसुली) तक्ता.
३. सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे रोख रक्कम पावती पुस्तके.
४. सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे चेक रक्कम पावती पुस्तके.
५. सन २००९-१० या आर्थिक वर्षातील पोटकिर्द. (नमुना क्रमांक ५०)
६. सन २००९-१० या आर्थिक वर्षातील चेक रिटर्न नोंदवही.
७. सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे कर आकारणी पुस्तक करदात्यास परिक्षणासाठी (मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम १३ (१) प्रमाणे)
८. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम ७६ नुसार मागणी पुस्तक.
९. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम १७ नुसार व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम ७५(५) अन्वये तक्रार अर्जाचे नोंद रजिस्टर.
१०. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र. १४४(१) अन्वये फॉर्म क्र. ११४ प्रमाणे जंगम मालमत्ता रजिस्टर.
११. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम ८१(२) अन्वये नमुना क्रं.५१ सादर करणे.
१२. कर आकारणी प्रकरणे (सन २००९-१०)

१३. कर आकारणी पुरवणी प्रकरणे (सन २००९-१०)

१४. मालमत्ता हस्तातंरण रजिस्टर (संपूर्ण नस्तीसह)

१५. जनरल स्टॅप रजिस्टर. (मुद्रांक लेखा नमुना क्रमांक ११३)

१६. पावती पुस्तकांचे साठा रजिस्टर. (नमुना क्रमांक ११६)

१७. प्रभाग क्रं. २ मधील अपिल प्रकरण नस्ती.

१८. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम १० अन्वये प्रभाग निहाय कर आकारणी पुस्तक सादर करणे.

१९. डिमांड नोटीस फी रजिस्टर.

२०. डिमांड नोटीस/जप्ती/वॉरंट फी पुस्तके

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १४४९ चे अनुसुची प्रकरण ३ मधील नियम ६ व ७ नुसार लेखापरिक्षणाबाबत विनाविलंब दप्तर उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

उक्त नियमाच्या तरतुदीनुसार विभाग प्रमुखांनी कार्यवाही केलेली नाही.

## सन २००९-१०
## वैदयकिय आरोग्य विभाग

**आक्षेप क्र :- ३४**

वैद्यकिय आरोग्य विभागात सन २००९-१० या आर्थिक वर्षात खरेदी केलेल्या औषधांच्या साठयाच्या नोंदी नमुना क्रमांक नियम १४५(१) (३) १४६, १५०, (४) व १५३ नुसार महानगरपालिकेचा साठा रजिस्टरमध्ये घेतल्या जातात. वैदयकिय आरोग्य विभागाने सन २००९-१० वर्षात उक्त मुदयातील नोंदवही अदयावत ठेवणे बंधन कारक असतांना नोंदवहि अदयावत न केल्याचे निदर्शनास येते. साठा रजिस्टर मध्ये पृष्ठयोता अनुक्रमांक देऊन साठा रजिस्टर नोंदवहित एकुण किती पृष्ठये आहेत याचा उल्लेख नोंदवहिच्या शेवटी शेरा मारुन प्रमाणिक करणे जरुरीचे आहे. परंतु विभाग प्रमुखाने प्रमाणित करुन साक्षांकित केलेले नाही. तसेच नोंदवहीच्या प्रत्येक पानावर पालिकेची मुद्रा उमटविणे जरुरीचे असतांना तसे केले नाही.

**आक्षेप क्र :- ३५**

वैदयकिय आरोग्य विभागाने सन २००९ – १० या आर्थिक वर्षात मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत चालविण्यात येणा-या दवाखान्यात येणा-या रुग्नांना औषधे देण्याकरिता खरेदी केलेली विविध औषधे साठा रजिस्टर मध्ये नोंद करणे जरुरीचे आहे. परंतु सदरच्या नोंदी साठा रजिस्टर क्रमांक -१ व साठा रजिस्टर क्रं. २ वरील औषधाचा साठा पालिकेला पुरवठादारा कडून प्राप्त झाल्यानंतर कोणत्या कार्यादेशान्वये मालाची मागणी केली होती. तो तेवढया प्रमाणात प्राप्त झालेला आहे. कामाची नोंद रजिस्टर मध्ये घेऊन विभागप्रमुखाने साक्षांकित करणे जरुरीचे आहे. परंतु तशा नोंदी केलेल्या नाहीत. तसेच मुख्यकार्यालयातून इतर आरोग्य केंद्रांना मागणीप्रमाणे औषधांचे वितरण करतांना प्रत्येक औषध निहात उपलब्ध साठा व वितरणं व शिल्लक साठा याची नोंद असणे जरुरीचे आहे. परंतु साठा रजिस्टर मध्ये नोंदी अदयावत केलेले नाही. तसेच वस्तु देणा-या अधिका-यांची स्वाक्षरी केलेली नाही. तसेच आर्थिक वर्ष संपल्यानंतर विभागप्रमुखाने साठा रजिस्टर मध्ये शिल्लक साठाची नोंद घेऊन प्रमाणित करणे जरुरीचे आहे.

## सन २००९-१०
## कर विभाग

***आक्षेप क्रं ३६ :- कर विभाग, उत्तन, डोंगरी, मुर्धा राई ....***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ मुख्यलेखापरिक्षकाने आर्थिक वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महापालिकेच्या मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायीसमिती सादर केला पाहिजे अशी तरतुद आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका एकत्रित मालमत्ता कर विभागाला त्यांचे कडील मागील आर्थिक वर्षाचे (सन २००९-१०) मधील उत्तन, डोंगरी, राई-मुर्धा विभागातील लेखे लेखापरिक्षण विभागाकडे तपासणीकरिता जमा करणेबाबत जा.क्र.मुलेप/१३७/२००९-१० दि. १५/०२/२०१० रोजी कळविले आहेत. तसेच दुरध्वनी, भ्रमण ध्वनीवरुन कर निर्धारक व संकलक यांच्या कार्यालयात तसेच उत्तन,डोंगरी,राई-मुर्धा कार्यालयात वेळोवेळी कळवून देखिल सन २००९-१० हया वर्षाचे लेखे सादर केले नसल्यामुळे उक्त विभागातील एकत्रित मालमत्ता वसुली, नविन कर आकारणी,नावात बदल हस्तांतरणाची प्रकरणे तपासता आली नाहीत त्यामुळे अहवालात समाविष्ठ करता आले नाही.

## सन २००९-१०
## शिक्षण विभाग

**आक्षेप क्र :- ३७**

शिक्षण विभागात शिक्षक वृंदाच्या सन २००९-१० या आर्थिक वर्षातील भविष्य निर्वाह निधी खाते नोंदवहि खाते प्रमुखाने एकुण किती पृष्ठये आहेत त्याची नोंद घेवुन प्रमाणित केले पाहिजेत परंतु शिक्षण विभागाच्या भविष्य निर्वाह निधी खाते नोंद वहि नमुना क्रं. ९८ नियम १३४(३) व (५) नुसार ठेवलेली नोंदवहि क्रं. १ व २ प्रमाणित केलेले नाही. तसेच नोंदवहि क्रं. १ पृष्ठांकित केलेली नाही.

**आक्षेप क्र :- ३८**

भविष्य निर्वाह निधी नोंद वहि नमुना क्रं. ९८ नियम १३४(३) व (५) क्रमांक १ व २ वर नियम १३४ (३) व (५) क्रमांक १ व २ वर भविष्य निर्वाह निधी खातेदारांनी भरलेल्या मुदयांची व त्यावर आकारण्यात येणा-या व्याज रक्कमे करिता करावयाची परगणना केलेली नाही. त्याचप्रमाणे सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या खातेदारांची परिगणना केलेली आहे. परंतु उर्वरित खातेदारांच्या नोंदी अपूर्ण आहेत.

**आक्षेप क्र :- ३९**

भविष्य निर्वाह निधी नोंदवही नमुना व ९९ नियम १३४(३) नुसार अदययावत करणेकरिता नोंदवहीच्या शेवटी विभाग प्रमुखाने नोंदवहितील पृष्ठसंख्या नमुद करुन प्रमाणित करावयाची आहे. परंतु पृष्ठसंख्या नोंद केलेली नाही व प्रमाणित केलेली नाही.

**आक्षेप क्र :- ४०**

भविष्य निर्वाह निधी नमुना क्रं. ९८ (नियम १३४ (३) व (५) खाते नोंदवहि आर्थिक वर्षा समाप्ती नंतर खाते प्रमुखाने नोंदवहितील नोंद तपासुन प्रमाणित केलेल्या नाहीत तसेच तारखांच्या नोंदी अपूर्ण आहेत.

**आक्षेप क्र :- ४१**

भविष्य निर्वाह निधी वृत्तपत्रक नमुना नं. ९९ नियम क्रं. १३४(३) नोंदवहितील व भविष्य निर्वाह नोंदवहि नमुना नं. ९८ नियम क्रं. १३४(३) व (५) मधील खाते क्रं. २०१ पर्यंत नोंदी पूर्ण आहेत. परंतु खाते क्रं. २०२ ते खाते क्रं. ३४० पर्यंत व्याजाची परिगणा अपूर्ण आहे. तसेच नोंदी अपूर्ण आहेत.

## सन २००९-१०
## संगणक विभाग

***आक्षेप क्र :- ४२***

संगणक विभागाने सन २००९-१० या वर्षात खरेदी केलेले किबोर्ड, माऊस, लॅपटॉप, हार्डडिस्क, रॅम, USB MODERN , ॲन्टी वायरस, सर्वरमधील Ram Upgrade करणेबाबत नविन रॅम खरेदी Lan, बिनतारी संदेश यंत्रणेची सामुग्री, प्रिन्टर खरेदी जंगम मालमत्ता नोंदवही नमुना नंबर ११४ विभाग प्रमुखाच्या सही शिक्यानिशी प्रमाणित केल्याची नोंद नाही तसेच जंगम मालमत्तेचे प्रत्येक पानावर पालिकेची मुद्रा उमटविलेली नाही.

***आक्षेप क्र :- ४३***

संगणक विभागाने सन २००९-१० या आर्थिक वर्षात जंगम मालमत्ता नोंदवही नमुना नं. ११४ वर सुरुवातीस संगणक विभागाकडे असलेली जंगम साधन सामुग्री किती आहे. याची नोंद केलेली नाही.. त्यामुळे सदय स्थितित संगणक विभागाकडे आजमितीस किती जंगम सामुग्री उपलब्ध आहे याचा अंदाज येत नाही.

***आक्षेप क्र :- ४४***

संगणक विभागाने सन २००९-१० हया आर्थिक वर्षात जंगम मालमत्ता नोंदवही नमुनानंबर ११४ वर प्रत्येक वसुली नोंद काटेकोरपणे घेऊन अनुक्रमानिकेवर त्याची स्पष्ट नोंदी घेतलेल्या नाहीत. अनुक्रमानिकेवर खाडाखोड केलेली आहे. तसेच कोणती वस्तु कोणत्या पानावर किती संख्येने घेतलेली आहे त्याची नोंद घेतलेली नाही.

***आक्षेप क्र :-४५***

*संगणक विभागाने सन २००९-१० या आर्थिक वर्षात खरेदी केलेली जंगम मालमत्ता रजिस्टर नमुना नं-११४, खालील पानावरील नोंदी आहेत..*

| अ.क्र. | वस्तुचे नांव | पान क्रं. | वस्तुसंख्या |
|---|---|---|---|
| १ | किबोर्ड | १ | २० |
| २ | माऊस | ४ | २० |
| ३ | लॅपटॉप | ६ | ०१ |
| ४ | हार्डडिस्क | ८ | ०१ |
| ५ | रॅम | ४ | १० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | हार्डडिस्क | १० | ०१ |
| ७ | किबोर्ड/माउस फीलीप्स MM कोंबो | १० | ०२ |
| ८ | USB MODERN | ११ | ०१ |
| ९ | USB Wireless Modern | ११ | ०१ |
| १० | ॲन्टी वायरस सॉफ्टवेअर | १२ | ०१ |
| ११ | IGB DDR 1266 MHZ ECC Reg Server Ram make Kingstar | १४ | ०४ |
| १२ | Lan (LOCAL AREA NETWORKING) | ०१ | १६ |
| १३ | प्रिन्टर | ०१ | ४९ |

उपरोक्त प्रमाणे नोंदी घेतलेल्या आहेत. परंतु वस्तुची मागणी केल्यानंतर विभागाने ती वस्तु स्विकारल्यानंतर किंवा प्राप्त झाल्या नंतर सदर वस्तु पूरवठा दाराने केव्हा व कोणत्या चलनाने पाठविली आहे त्या चलन क्रमांक व दिनांक सह तसे संगणक विभागाने पुरवठा दाराला कोणत्या कार्यादेशाद्वारे वस्तु पुरवठा करणे करिता आदेश दिलेले होते . त्याची नोंद विभागप्रमुखाने स्व:तच्या सही व शिक्यानिशी नोंद केलेली नाही.

*आक्षेप क्र :- ४६*

संगणक विभागाने सन २००९-१० या आर्थिक वर्षात खरेदी केलेली कंन्झ्यूमेबल स्टेशनरी साठी नोंदवही क्रं. १ व २ नमुना नंबर ११६ विभाग प्रमुखाने सही शिक्यानिशी रजिस्टर मध्ये एकुण किती पाने आहे याची नोंद घेतलेली नाही. तसेच नोंद पहिल्या प्रत्येक पानावर महानगरपालिकेची मुद्रा उमटवलेली नाही.

*आक्षेप क्र :- ४७*

कंझ्युमेबल स्टेशनरीची साठा नोंदवही क्रं. १ व नोंदवहि क्रं. २ नमुना नं ११६ पान क्रं. ३ वर पेनड्राईव्ह सामान्य प्रशासन विभागाला १ नग दिलेला आहे. परंतु पूर्वीचा साठी किती याची नोंद घेतलेली नाही. पान क्रं.५ वर HP – 10A (Black) Cartridge महापौर निवास स्थानास दिलेले आहे.परंतु पूर्वीच्या साठा किती याची नोंद नाही पान क्रं. ९ वर 11-A (Yellow) (Magneta) (Cyan) नग ३ ची नोंद आहे. परंतु संगणक विभागाकडे केव्हा प्राप्त झाला किंवा या आगोदरच साठा होता याबाबत नोंद नाही. तसेच सिस्टिम मॅनेजरने स्वाक्षरी केलेली नाही. पान क्रं. २० वर HP-Deskjet 27 (NEW) एकुण २० नगांची नोंद आहे. परंतु खाडाखोड

आहे तसेच सिस्टिम मॅनेजरने शिक्यानिशी सही केलेली नाही. पान क्रं. २२ वर (Q 26112-A)(Refill) याची नोंद घेतलेली आहे परंतु सिस्टिम मॅनेजरने स्वाक्षरी केलेली नाही. पान क्रं. ४९ वर Laserjet -P 2015 (53- A) Toner ची नोंद आहे. परंतु कोणत्या तारखेत प्राप्त झाले व चलन नंबरची नोंद साठा रजिस्टर मध्ये घेतलेली नाही तसेच सिस्टिम मॅनेजरने माल ताब्यात मिळण्याबाबत शिक्यानिशी स्वाक्षरी केलेली नाही.

संगणक विभागाने सन २००९-१० या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे विविध कामे करुन घेणे करिता ठेकेदारांना कार्यादेश निर्गमित केलेले होते.परंतु सदरच्या ठेकेदारांकडून काम पूर्ण करुन घेणे करिता मुंबई प्रादेशिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण कलम नुसार ठेकेदारांकडून संविदा करारनामे करुन घेणे जरुरीचे असतांना करारनामे अपूर्ण आहेत. ते खालीलप्रमाणे.

| अ.क्र | कामाचे स्वरुप | ठेकेदाराचे नांव | अपूर्णता: |
|---|---|---|---|
| १ | संगणक कंझ्युमेबल स्टेशनरी तसेच प्लेन स्टेशनरी खरेदी करणे. | मे. बॉन मेरी कम्प्युटर लि. | मा. उपायुक्त स्थायी समिती व मनपा |
| २ | नविन हेव्ही डयूटी प्रिंटर ९०४० डिएन खरेदी | मे. के.जे.एम. ग्रुप सिस्टिम सोल्युशन | मा. स्थायी समिती सदस्य सहया व मनपा मुद्रा उमटविलेली नाही. |
| ३ | बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करणे (Motorola) सेट खरेदी करणे. | मे. मोटोरोला इंडिया प्रा.लि. | सदरच्या ठेकेदाराकडून संविदा करून घेतलेली नाही. |
| ४ | महानगरपालिकेच्या विविध विभागातील संगणक संच, प्रिन्टर व इतर साहित्य देखभाल व दुरुस्ती करणे. | मे. के.जे.एफ सिस्टीम सोल्युशन | मा. स्थायी समिती सदस्य यांच्या सहया व मनपा मुद्रा उमटविलेली नाही. |

## सन २००९-१०
## आरोग्य विभाग

### आक्षेप क्र ४८ :- पावसाळया पूर्वी नाले साफसफाई कामातील अनियमितता.

| अ.क्र | कामाचे स्वरुप | ठेकेदाराचे नांव | कार्यादेश क्रमांक | लेखापरिक्षण आक्षेप |
|---|---|---|---|---|
| १ | नालेसफाई/खोदाई कामी जे.सी.बी. मशिन, पोकलन मशिन, बोटीवर पोकलन पुरवठा. | मे. आशापुरा कन्स्ट्रक्शन कंपनी | जा.क्र/मनपा/आरोग्य/९१/०९-१० दि. १३/५/०९ | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार करारनामा पूर्ण केलेला नाही. |
| २ | नाल्यातील निघालेला गाळ माती, कचरा वाहतूक करणे कामी भाडयाने मजूर व डंपर पुरवठा करणे. | मे.बैजू कन्स्ट्रक्शन | जा.क्र/मनपा/आरोग्य/३२/०९-१० दि. ४/५/०९ | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार करारनामा पूर्ण केलेला नाही. |
| ३ | नाल्यातील निघालेला गाळ माती, कचरा वाहतूक करणे कामी भाडयाने मजुर व डंपर पुरवठा करणे. | मे. जयश्री कृष्णा ट्रान्सपोर्ट | जा.क्र/मनपा/आरोग्य/२७९-१० दि. ४/५/०९ | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार करारनामा पूर्ण केलेला नाही. |
| ४ | नालेसफाई/खोदाई कामी जे.सी.बी. मशिन, पोकलन मशिन, बोटीसह पोकलन मशिन पुरवठा करणे. | मे. गणेश अर्थ मुव्हिंग कंपनी | जा.क्र/मनपा/आरोग्य/४१/०९-१० दि. ६/५/०९ | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार करारनामा पूर्ण केलेला नाही. |
| ५ | पावसाठी पाणी निचरा करणेकामी NP-३ आर सी.सी पाईप पुरवठा करुन फिक्सींग करणे. | मे. गणेश डेव्हलपर्स | जा.क्र/मनपा/आरोग्य/६७/०९-१० दि. ८/५/०९ | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार करारनामा पूर्ण केलेला नाही. |
| ६ | ---//--- | मे. गजानन डेव्हलपर्स | जा.क्र/मनपा/आरोग्य/६६/०९-१० दि. ८/५/०९ | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार करारनामा पूर्ण केलेला नाही. |
| ७ | पावसाच्या पाण्याचा उपसा (डिपॉटरींग) करणेसाठी विविध क्षमतेचे सक्शन पंप भाडयाने पुरवठा करणे. | मे. मनोहर ट्रेडिंग कंपनी | जा.क्र/मनपा/आरोग्य/१०४/०९-१० दि. १९/५/०९ | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार करारनामा पूर्ण केलेला नाही. |

## आक्षेप क्र ४९ :-सार्वजनिक आरोग्यविभाग औषधखरेदी प्रकरणातील अनियमितता...

| अ.क्र. | कामाचे वर्णन | ठेकेदाराचे नांव | कार्यादेश क्रमांक | लेखापरिक्षण आक्षेप |
|---|---|---|---|---|
| १ | फेन्थी ऑन | मे. रमेश ॲग्रो | मनपा/आरोग्य/१००/०९-१० दि. १६/५/०९ | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ७३ नुसार करारनामे पूर्ण केलेले नाहीत. विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही. |
| २ | साप फ्लोथीन | | | |
| ३ | डेल्टामेथीन | | | |
| ४ | फेन्थी ऑन | मे. रमेश ॲग्रो | मनपा/आरोग्य/१८१/०९-१० दि. २९/६/०९ | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ७३ नुसार करारनामे पूर्ण केलेले नाहीत. विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही. तसेच वस्तु घेणा-या संबंधित विभागातील स्वच्छता निरिक्षकाने वस्तु स्विकारल्याची स्वाक्षरी केलेली नाही. |
| ५ | सायफ्लोथीन | | | |
| ६ | डेल्टामेथीन | | | |
| ७ | फेन्थीऑन | मे. रमेश ॲग्रो | मनपा/आरोग्य/३९६/०९-१० दि. १७/११/०९ | मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ७३ नुसार करारनामे पूर्ण केलेले नाहीत. विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही. तसेच वस्तु घेणा-या संबंधित विभागातील स्वच्छता निरिक्षकाने वस्तु स्विकारल्याची स्वाक्षरी केलेली नाही. |
| ८ | सायफ्लोथीन | | | |
| ९ | डेल्टामेथीन | | | |

| अ.क्र. | कामाचे वर्णन | ठेकेदाराचे नांव | कार्यादेश क्रमांक | लेखापरिक्षण आक्षेप |
| --- | --- | --- | --- | --- |
| १० | चेक्टोबॅक | मे. रमेश ॲग्रो | मनपा/आरोग्य/५१४/०९-१० दि. ११/०१/२०१० | १)मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ७३ नुसार करारनामे पूर्ण केलेले नाहीत. २) विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही. ३) तसेच वस्तु घेणा-या संबंधित विभागातील स्वच्छता निरिक्षकाने वस्तु स्विकारल्याची स्वाक्षरी केलेली नाही. |
| ११ | सोल्ड पॅक | मे. रमेश ॲग्रो | मनपा/आरोग्य/१४०/०९-१० दि. ०६/६/०९ | करारनामा केलेला आहे. तसेच मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही. कार्यादेशाची साठा रजिस्टरमध्ये नोंद घेतलेली नाही. |
| १२ | जर्मिटॉक्स प्लस डी.पी. | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | मनपा/ आरोग्य/१३९/२००९-१० दि. ०६/०६/०९ | १) करारनामा केलेला आहे. मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही. २) विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही. |
| १३ | पिपेक्स केक | मे. डॉल्फीन सेल्स कॉपोरेशन | मनपा/आरोग्य/१३९/०९-१० दि. ६/६/०९ | १) करारनामा केलेला आहे. मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही. २) विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही. |
| १४ | कार्बोलिक पावडर | मे.लक्षता ट्रेडिंग कंपनी | मनपा/आरोग्य/४०८/०९-१० दि. २४/११/०९ | करारनामा केलेला आहे. मात्र मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही. |

| अ.क्र. | कामाचे वर्णन | ठेकेदाराचे नांव | कार्यादेश क्रमांक | लेखापरिक्षण आक्षेप |
|---|---|---|---|---|
| १५ | कार्बोलिक पावडर | मे.लक्षता ट्रेडिंग कंपनी | मनपा/आरोग्य/५८३/०९-१० दि. १८/०२/०१० | १) करारनामा केलेला आहे. मात्र मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही.<br><br>२) विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही.<br><br>३) तसेच वस्तु घेणा-या संबंधित विभागातील स्वच्छता निरिक्षकाने वस्तु स्विकारल्याची स्वाक्षरी केलेली नाही. |
| १६ | कार्बोलिक पावडर | मे.लक्षता ट्रेडिंग कंपनी | मनपा/आरोग्य/६२२/०९-१० दि. ११/०३/१० | १) करारनामा केलेला आहे. मात्र मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही.<br><br>२) विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही.<br>३) तसेच वस्तु घेणा-या संबंधित विभागातील स्वच्छता निरिक्षकाने वस्तु स्विकारल्याची स्वाक्षरी केलेली नाही. |
| १७ | डीप्लुबेंन झुरोन २५% wp | मे. रमेश अॅग्रोकेम. कॉर्पो. | मनपा/आरोग्य/४४३/०९-१० दि. ११/०३/१० | करारानामा केलेला आहे. मात्र मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही. |
| १८ | मॅलेरॉन पी. ऑईल | मे. महाराष्ट्र स्टेट को. ऑ. कन्झुमर्स फेडरेशन लि. | मनपा/आरोग्य/ ३९८/०९-१० दि. १७/११/०९ | करारनामा नाही<br>महाराष्ट्र शासन क्रं. सपस/१००६/प्रक्र/३३७/२४/स.मंत्रालय मुंबई – ३२ दि. १९/१/०७<br>मा. स्थायी समितीचा ठराव नाही. |

| अ.क्र. | कामाचे वर्णन | ठेकेदाराचे नांव | कार्यादेश क्रमांक | लेखापरिक्षण आक्षेप |
|---|---|---|---|---|
| १९ | हर्बल बायोडिऑडीरायजर (सुमा गारबेज डिओरवाझर) | मे. जॉन्सन डायव्हसही इंडिया प्रा.लि. | मनपा/आरोग्य/४१०/०९-१० दि. २५/११/०९ | १) करारनामा नाही<br><br>२) विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही.<br><br>३) तसेच वस्तु घेणा-या संबंधित विभागातील स्वच्छता निरिक्षकाने वस्तु स्विकारल्याची स्वाक्षरी केलेली नाही. |
| २० | अल्फा सायफरमेथ्रीन ५ % wp | मे. ॲकॉर्ड इंटरप्रायझेस | मनपा/आरोग्य/५६३/०९-१० दि. ०६/०२/१० | १)करारनामा नाही.<br>२) विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही.<br>३) तसेच वस्तु घेणा-या संबंधित विभागातील स्वच्छता निरिक्षकाने वस्तु स्विकारल्याची स्वाक्षरी केलेली नाही. |
| २१ | पायरोसीन ऑईल ई | मे.रमेश ॲग्रोकेम कार्पो | मनपा/आरोग्य/४४४/०९-१० दि. १५/१२/०९ | करारनामा आहे. मात्र मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही. |
| २२ | पायरोसीन ऑईल -ई | मे.रमेश ॲग्रोकेम कॉर्पो. | मनपा/आरोग्य/६०२/०९-१० दि. ११/०३/१० | करारनामा आहे. मात्र मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही. |
| २३ | सर्वो ॲग्रो ऑईल | | मुळ नस्ती सापडली नाही. | १) करारनामा नाही. मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही.<br><br>२) विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही.<br><br>४) तसेच वस्तु घेणा-या संबंधित विभागातील स्वच्छता |

| अ.क्र. | कामाचे वर्णन | ठेकेदाराचे नांव | कार्यादेश क्रमांक | लेखापरिक्षण आक्षेप |
|---|---|---|---|---|
| | | | | निरिक्षकाने वस्तु स्विकारल्याची स्वाक्षरी केलेली नाही. |
| २४ | सुमो गारबेज डिओडरवायझर | मे. जॉन्सन डायव्हसरी इं. प्रा.लि. | मनपा/आरोग्य/४१०/०९-१० दि. २५/११/०९ | १) करारनामा नाही. मा. स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरी नाही.<br>२) विभाग प्रमुखांची साठा रजिस्टरवर स्वाक्षरी केलेली नाही.<br>३) तसेच वस्तु घेणा-या संबंधित विभागातील स्वच्छता निरिक्षकाने वस्तु स्विकारल्याची स्वाक्षरी केलेली नाही. |

## सन २००९-१०
## मिरारोड प्रभाग क्रं. ०४
## कर विभाग

**आक्षेप क्रं. ५० :- मागील आक्षेपांचे अनुपालन न केल्याबाबत...**

सन २००४/०५ घरपट्टी मुद्दा क्रं. ६० वॉर्ड क्रं. ई-५

सन २००५-०६ चेना विभाग मुद्दा क्रं. १६ मिरा, मुद्दा १७ मिरारोड ई-५, मुद्दा क्रं. १५

सन २००६-०७ मिरारोड मुद्दा क्रं. ६१,६२,६३,६४,६६

सन २००७-०८ मुद्दा क्रं. ३५,३६,३७,३८ मिरारोड येथील आक्षेप.

सन २००८-०९ मिरारोड ८३,८४,८५ हया आक्षेपांचे अनुपालन वारंवार मागणी करुनही करुन दिलेले नाही.

मा. स्थायी समिती सभा दि. ३/२/२००७ ठराव क्र. १८६ नुसार वार्षिक अहवालातील काढलेल्या आक्षेपांची पूर्तता एक महिन्याच्या आत करणेबाबत ठराव पारित झालेला आहे. तसेच जा.क्र.मनपा/मुलेप/३६/१०-११ दि. २१/४/२०१० रोजी सदर आक्षेपांचे अनुपालन करणेबाबत संबंधीत विभागप्रमुखांना पत्रव्यवहार करणेत आलेला आहे. परंतु सदर आक्षेपांचे अनुपालन करणेंत आलेले नाही.

**आक्षेप क्रं.५१ :- अस्तित्वात नसलेल्या मालमत्ता/तोडलेल्या मालमत्ता दुबार नोंद मालमत्तेची कर आकारणी निर्लेखीत प्रकरणाबाबत.**

१) प्रभाग क्रं.०४ मधील काशी,चेना,घोडबंदर,मिरारोड, मिरागांव हया विभागाकडून निर्लेखीत रक्कम करणेसाठी प्रस्ताव सादर केलेला होता. त्यानुसार सदर जागेवर प्रत्यक्ष जाऊ न पाहणी केली असता काही मालमत्ता धारकांना मालमत्ता कराचा भरणा करणेस सांगितले असता त्यांनी कराचा भरणा केलेला आहे. प्रभाग कार्यालय घोडबंदर येथील निर्लेखीत प्रकरणातील रक्कम रु. ९४९३९५/- वसुल करुन घेतलेली आहे.

२) पत्राशेडची वसुली झालेली नाही. आकारणी केल्यानंतर वसुली होणे आवश्यक असताना पत्राशेडची वसुली कधीही झालेली दिसुन येत नाही. पत्राशेडचे पैसे भरणा होत नाही. हया करिता विभाग प्रमुखांनी वसुलीसाठी ठोस उपाययोजना करावी.

३) ई- ०१००२६५१४ जगदिश गांधी वैभव इस्टेट सदनिका क्रं.०३ दि. २९/११/०७ पर्यंत ५६४०४ चा प्रस्ताव निर्लेखीत साठी आलेला होता सदरची रक्कम मागणी आकारणीला दिसुन येत नाही. त्यामुळे रक्कम कशाच्या आधारे कमी केली याचा खुलासा झालेला नाही. सदरची रक्कम संगणकामधुन परस्पर कमी केलेली दिसुन येते हया करीता अशी परस्पर रक्कम कमी करणे यावर विभाग प्रमुखांनी लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

४) ई – ०१००२७१०९०० विश्वकर्मा गुप्ता सत्य साई ईस्टेट स.क्र.१३ हयावरील कर आकारणीची रक्कम २९२५५ संगणकामधुन परस्पर कमी केलेली दिसुन येते नंतर रक्कम निर्लेखीत करणेसाठी प्रस्ताव सादर करणे गैरव्यवहाराचे दिसुन येते हया करिता विभाग प्रमुखांनी अशा गैरव्यवहारावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

५) वैभव इंड.इस्टेट कोर्स क्रॉप्ट ४८/अे, ४८ या गाळयांचा कर रद्द करणेसाठी प्रस्ताव सादर केलेला असताना रक्कम रु. ६४,६१३/- मुख्यलेखापरिक्षण विभागाने वसुल करुन घेतलेली आहे.

६) ई – ०९००२८८३२०० टाऊन पॅलेस सदनिका क्रं. ३०२ थकीत रक्कम २९६०३ आहे. एकाच सदनिकेला दोन वेळा कर आकारणी करुन घेतलेली आहे. त्यामुळे रक्कम थकित दिसुन येते हया करीता कर आकारणी दुबार होणार नाही याची दक्षता विभागप्रमुखांनी घेणे आवश्यक आहे.

७) म्हाडा कॉलनी मालमत्ता क्रं.ई – १५००३१४१०० खोली क्रं. १ ते १४५ मालमत्ता या मालमत्तेमध्ये नविन गाळे काढलेले आहेत. जागा वाढविलेली आहे. कर आकारणी झालेली नाही. त्यामुळे मनपाच्या महसुल कमी होत आहे. त्यासाठी नविन वाढिव कर आकारणी शोधुन महसुलमध्ये वाढ करणेसाठी विभाग प्रमुखांनी प्रयत्न करावेत. मालमत्ता अस्तित्वात असताना ती अस्तित्वात नाही असे मानुन सदर मालमत्तेचा कर

निर्लेखीत करणेबाबत प्रस्ताव पाठविणे ही गंभीर बाब आहे. निर्लेखीत प्रकरणामधील अशा प्रकारची मालमत्ता कराची वसुली होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरिता संबंधीत अधिका-यांनी निर्लेखीत प्रकरणे सादर करताना योग्य चौकशी करुन सादर करावीत त्यामुळे मनपाच्या महसुल कमी होणार नाही. त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

### आक्षेप क्रं.५२ :- प्रभाग क्रं. ०४ मधील कामकाजाबाबत...

महानगरपालिका हद्दीत प्रभाग निहाय मालमत्ता कराची आकारणी व वसुली करण्यात येत आहे. कराची मागणी करणेपूर्वी प्रत्येक मिळकतीचे मुल्य व कर निर्धारण निश्चित करणेसाठी प्रभाग निहाय कर आकारणी पुस्तके ठेवून अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

लेखा संहिता १९७१ मधील नियम १४३ नुसार प्रत्येक प्रभागासाठी स्टॅम्प रजिस्टर आवश्यक आहे. ते ठेवलेले नाही. ठेवण्यात यावे. मुल्य निर्धारण विरुध्द आलेल्या तक्रारी अर्जाचे नोंद रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर विभागाकडे एकूण किती तक्रार अर्ज आले. किती बाबतीत निर्णय झाले. त्याप्रमाणे प्रकरणे उपलब्ध झाली किंवा कसे तसेच तक्रार अर्जाची विधी ग्राहयता या बाबती पडताळणी करणेसाठी त्यांचा उपयोग होउ शकतो. ते विभाग प्रमुखांनी खात्री करुन रजिस्टर ठेवण्यांत यावे.

कर वसुली विभागामार्फत थकबाकीदारांना कराची थकबाकी वसुलीसाठी डिमांड नोटीस बजावण्यांत येते डिमांड नोटीसीमध्ये दर्शविलेल्या मुदतीत रक्कम वसुल न झाल्यास संबंधीतांच्या स्थावर/जंगम/मिळकती जप्त करणेबाबत जप्तीचे अधिपत्र काढण्यांत येते अशाप्रकारे प्रत्येक अधिपत्रांची नोंद स्वतंत्र रजिस्टरवर घ्यावयाची आहे. त्यामुळे सदर विभागाने किती अधिपत्रे बजावली व अधिपत्र बजावलेल्या मिळकतीचे बाबतीत थकीत रक्कमा व इतर अनुषंगीक खर्चाचे वसुलीबाबत काय कार्यवाही केली या बाबतची तपासणी करता येवू शकते. रजिस्टर ठेवलेले नसल्याने तपासणी करता आलेली नाही.

वरील रजिस्टर ठेवणेसाठी वारंवार सुचना देवून देखिल रजिस्टर ठेवेलेले नाही त्या करीता अधिका-यांनी हया बाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

*आक्षेप क्रं. ५३ :- चेक रिर्टनची रक्कम कॅश बुकमधुन कमी करणेबाबत...*

मिरारोड, मिरागांव, चेना, वर्सोवा, घोडबंदर, काशी हया विभागातील चेकने आलेली रक्कम चेक परत गेल्याने कॅशबुकमध्ये सदरची रक्कम वाढलेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी चेकने प्राप्त झालेली रक्कम चेक रिर्टन गेल्यावर सदरची रक्कम वसुल झाली किंवा नाही त्यावर केलेली कार्यवाही तसेच आर्थिक वर्षात कॅशबुकातील कमी करावयाची रक्कम समजुन येत नाही. त्यासाठी विभागप्रमुखांनी सदरची रक्कम कमी करण्याची कार्यवाही करावी.

## सन २००९-१०
## आस्थापना विभाग

***आक्षेप क्रं. ५४ :- आयकर कपातीबाबत...***

१) आयकर अधिनियम १९६२ चे कलम १९४ (सी) अन्वये कपात करणेत आलेली आयकर रक्कमेचा भरणा सात दिवसांचे आत करणेबाबत तरतुद आहे. उक्त नियमानुसार विभाग प्रमुखांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२) भाडेतत्वावर वाहने उपलब्ध झालेली आहेत. त्यानुसार वाहन वापरत असताना १००० रू. इंधन भत्ता दिलेला असल्यास तो विभाग प्रमुखांनी खात्री करून संबंधिताच्या वेतनातुन वसुल करण्यांत यावा.

३) निवृत्ती वेतनधारक बिलांची तपासणी केली असता काही कर्मचारी यांचे दाखले उपलब्ध झालेले नाहीत. ते पहावयास मिळाले नाहीत म्हणून निवृत्ती वेतन धारकांकडून प्रत्येक वर्षाच्या डिसेंबर व जुन महिन्यात हयातीच्या दाखला व पुर्नविवाह केला नसल्याबाबत दाखला घेण्यांत यावा.

## सन २००९-१०
## महिला व बालकल्याण विभाग

**आक्षेप क्रं. ५५ :- महिला व बालकल्याण विभाग...**

हया विभागांतील ९ बालवाडी शिक्षकांना मा. महासभा दि. २९/११/०८ ठराव क्रं. ७६ नुसार ३९०० मानधन दिले जाते. पद मंजुर नाहीत पद मंजुरीचा प्रस्ताव सादर करुन घेणेसाठी मागील अहवालात नमुद केले होते. कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. तरी विभागप्रमुखांनी कार्यवाही करावी.

## सन २००९-१०
## नगरसचिव विभाग

### आक्षेप क्रं. ५६ :- निधी वितरणा संबंधी...

महापौर सहायत्ता निधीतुन आर्थिक सहाय्य मिळणेसाठी प्राप्त होणा-या अर्जावर कार्यवाही करणेसाठी अर्ज प्राप्त झाल्यावर मा. नगरसचिव यांनी कागदपत्रांची पूर्णपणे तपासणी करुन मा. महापौरांनी केलेल्या आर्थिक मदतीच्या शिफारसीनुसार अंतिम मंजुरी ही कार्यकारी समितीच्या मंजुरीने करणे आवश्यक आहे. कार्यकारी समितीची मान्यता घेवून निधी अदा करावा समितीची मान्यता दिसुन आलेली नाही. त्याकरीता वरील बाबत खबरदारी घेण्यांत यावी.

## सन २००९-१०
## सामान्य प्रशासन विभाग

**आक्षेप क्रं. ५७ :-**

सामान्य प्रशासनामध्ये टेलीफोन बील, भ्रमणध्वनी बील येतात त्यांची अंतिम तारीख उलटून गेल्यानंतर बील अदा केले जाते. त्यामुळे मनपास दंडाची रक्कम नाहक भरावी लागते त्यासाठी टेलीफोन बील, भ्रमणध्वनीबील हे मुदतीत येईल हयासाठी विभागप्रमुखांनी नियंत्रण ठेवावे.

## सन २००९-१०
## *पाणी पुरवठा विभाग*

***आक्षेप क्रं. ५८ :-***

मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरणाकडून दररोज ८६ द.ल.लि. व एम.आय.डी.सी. कडून दररोज सरासरी १२ द.ल.लि. पाणी पुरवठा होतो. मिरा-भाईंदर शहराची सन २००१ च्या जणगणनेनुसार ५.६७ लक्ष लोकसंख्या होती व सद्यस्थितीत मिरा-भाईंदर शहराची लोकसंख्या जवळ जवळ १०.०० लक्ष पर्यंत पोहोचली आहे. मिरा-भाईंदर शहराचा विकास झपाटयाने होत आहे. विकासाच्या ओघात येथील लोकसंख्याही झपाटयाने वाढली आहे. मिरा-भाईंदर शहर मुंबई शहरालगत असल्याने नोकरी-धंद्यानिमित्त व तुलनेने स्वस्त दराने घरे उपलब्ध असल्याने लोकांचा या शहरात वसण्याचा ओघ जास्त आहे. पर्यायाने शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. मात्र लोकसंख्येत गेल्या काही वर्षापासुन झालेली वाढ व भविष्यातील अपेक्षित वाढ लक्षात घेता शहरास होणारा पाणी पुरवठा हा अत्यंत अपुरा आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा रू.४,५००/- प्रति द.ल.लि. (रू.४.५०/- प्रति हजार लिटर) तर एम.आय.डी.सी. कडून होणारा पाणी पुरवठा रू.८,०००/- प्रति द.ल.लि. (रू.८/- प्रति हजार लिटर) या दराने होत आहे. महानगरपालिका नागरीकांना रू.७/- प्रति हजार लिटर व घरगुती जलजोडण्यांकरीता व रू.२८/- प्रति हजार लिटर या दराने पाणीपट्टी आकारते. वास्तविक पाणी बिलापोटी महानगरपालिकेस होणारा खर्च लक्षात घेता उपरोक्त पाणीपट्टी दर अत्यंत कमी आहेत.

वाढती लोकसंख्या व त्या प्रमाणात पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता महानगरपालिकेस स्वत:चा स्त्रोत उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन शासनाने घोषित केलेल्या पाणी कपातीवेळी पाणी टंचाई भासणार नाही.

<u>सन २००९-१०</u>

| माहे | स्टेम प्राधिकरणाकडून प्रति माह प्राप्त झालेले पाणी (द.ल.लि. मध्ये) | पाणी बिलापोटी मनपाने स्टेम प्राधिकरणास अदा केलेली रक्कम | एम.आय.डी.सी. कडून प्रति माह प्राप्त झालेले पाणी (द.ल.लि. मध्ये) | पाणी बिलापोटी मनपाने एम.आय.डी.सी. ला अदा केलेली रक्कम | पंपिंग स्टेशनवरील ठेकेदारारा प्रतिमाह अदा केलेले बील | वीज देयक |
|---|---|---|---|---|---|---|
| जाने | २५८५.१२४ | ११६३३०५८.०० | १२६.६३० | १०१३०४०.०० | १२५९४४ | ८५५०७० |
| फेब्रु | २२५२.८८६ | १०१३७९८७.०० | ९१.३४५ | ७३०७६०.०० | १२५९४४ | ७३५११२ |
| मार्च | २५१४.६१८ | ११३१५७८१.०० | १०३.६२४ | ८२८९९२.०० | १२५९४४ | ८३५६३५ |
| एप्रिल | २४६३.४१० | ११०८५३४५.०० | १७२.६८१ | १३८१४४८.०० | १२५९४४ | ७६४०१७ |
| मे | २६१७.०७५ | ११७७६८३७.५० | १६९.२७० | १३५४१६०.०० | १२५९४४ | ७३८३९५ |
| जून | २४४३.४५९ | १०९९५५६५.५० | २२६.०३२ | १८०८२५६.०० | १२५९४४ | ७३०९१२ |
| जुलै | २५२१.१३९ | ११३४५१२५.५० | ३१८.२६८ | २५४६१४४.०० | १२५९४४ | ८०३१९५ |
| ऑगस्ट | २६३२.३६७ | ११८४५६५१.५० | २४४.९३७ | १९५९४९६.०० | १२५९४४ | ८७८४५९ |
| सप्टें | २५७५.५९० | ११५९०१५५.०० | ३४०.३५० | २७२२८००.०० | १२५९४४ | ९२३५०० |
| ऑक्टो | २६४८.२४९ | ११९१७१२०.५० | ३९५.६९० | ३१६५५२०.०० | १२५९४४ | ८७२४२६ |
| नोव्हे | २४९३.६६८ | ११२२१५०६.०० | ३३५.८१० | २६८६४८०.०० | १२५९४४ | ९०५७२६ |
| डिसें | २४८०.०७५ | १११६०३३७.५० | ३०६.९८२ | २४५५८५६.०० | १२५९४४ | ८९७०९३ |
| एकूण | ३०२२७.६६ | १३६०२४४७०.०० | २८३१.६२ | २२६५२९५२.०० | १५११३२८ | ९९३९५४० |

वरीलप्रमाणे रक्कम रु.१७,०१,२८,२९०/- इतका खर्च महानगरपालिकेस दरवर्षी पाणीपुरवठ्याकरीता करावा लागतो. सदर खर्चात जलवाहिनी खरेदी, अंथरणे व दुरुस्ती या कामाकरीता होणारा खर्च अंतर्भुत नाही.

## पाणी पुरवठा योजनेपासून सन २००९-१० या वर्षात मिळालेले उत्पन्न

| | थकबाकी | | | चालू (सुधारीत मागणी - मागणी रजिस्टरप्रमाणे) | | | एकूण वसुली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाणीपट्टी | उपकर | एकूण | पाणीपट्टी | उपकर | एकूण | |
| मागणी | ३०९५२५३७ | १९१६७५ | ३११४४२१२ | २५४१३२३१४ | १०९२४४८ | २५५२२४८४२ | २८६३६९०५४ |
| वसुली | १९३४६०११ | ९६५०३ | १९४४२५१४ | २४६३६२९६५ | १०४४२२२ | २४७४०७१८७ | २६६८४९७०१ |
| थकबाकी | ११६०६५२६ | ९५१७२ | ११७०१६९८ | ७७६९४२९ | ४८२२६ | ७८१७६५५ | १९५१९३५३ |
| | | | | | | टक्केवारी | ९३.१८ |

वरील वसुलीचे प्रमाण चांगले असले तरी १०० टक्के वसुली होणे आवश्यक आहे. जेणेकरून नविन पाणी पुरवठा योजनेकरीता निधी उपलब्ध होउ शकेल.

*आक्षेप क्रं. ५९ :-*

१) महानगरपालिका क्षेत्रात पाणीपट्टी वसुलीकरीता आर्थिक वर्षाच्या अखेरच्या त्रैमासिकात पाणीपट्टी वसुली मोहीम राबविण्यात येते. सदर मोहीमेवेळी पाणीपट्टी वसुली यचापैकी होते. मात्र त्याऐवजी प्रत्येक त्रैमासिकानंतर अशी मोहीम राबविल्यास पाणीपट्टी वेळीच वसुल होयून वर्ष अखेरीस वसुलीकरीता थकबाकी राहणार नाही व वसुलीमुळे आर्थिक ओघ सतत सुरु राहील.

२) धनादेश न वटलेल्या पाणीपट्टी देयकांची वसुली पंधरा दिवसात करणे आवश्यक आहे. अन्यथा धनादेश न वटल्याने फार मोठी कारवाई होत नाही असा भ्रम जलजोडणीधारकांमध्ये निर्माण होतो. तसेच आर्थिक वर्ष अखेरीस धनादेश देउन तो न वटण्याकडे काही जलजोडणीधारकांचा कल दिसून येतो. याकरीता अशा जलजोडणी धारकांवर ठोस कारवाई त्वरीत करणे अपेक्षित आहे.

३) संगणकीकरण अद्याप न झाल्याने पाणीपट्टी देयके अद्याप हस्तलिखित देण्यात येत आहेत. यामुळे वेळेचा अपव्यय व अचूकपणाचा अभाव दिसून येत आहे. संगणकीकरण केल्यास त्याचा महानगरपालिकेस फार मोठा फायदा होउ शकेल.

४) महानगरपालिकेस प्राप्त पाण्याचा तपशील उपलब्ध असला तरी प्रत्यक्ष किती पाणी जलजोडणीधारकांना पुरविले याचा तपशील उपलब्ध नाही. याकरीता प्रत्येक जलकुंभावर जलमापक यंत्र बसविल्यास रिडींग प्राप्त होउन वितरण केलेल्या पाण्याचा तपशिलही उपलब्ध होउ शकेल. यामुळे गळतीमुळे वाया जाणाऱ्या पाण्याचे तपशिलही उपलब्ध होउ शकेल.